cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७५ | सोमवार दि.१४ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### टास्क फोर्सच्या शिफारशी की पुन्हा एकदा कागदी मलमपट्टी?

महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भवितव्याशी संबंधित एमपीएससी परीक्षा व्यवस्था वारंवार संशयाच्या भोवऱ्यात सापडत असताना सरकारने टास्क फोर्सच्या माध्यमातून परीक्षा सुधारणांच्या काही शिफारशी पुढे केल्या आहेत. प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार करणे, परीक्षांचे वेळापत्रक किमान एक वर्ष आधी जाहीर करणे आणि परीक्षेपूर्वी रिक्त पदांची संख्या स्पष्ट करणे, या उपाययोजना वरकरणी आकर्षक वाटतात. पण मूळ प्रश्न असा आहे की, ज्या यंत्रणेकडून आधीच्या परीक्षा सुरक्षितपणे घेता आल्या नाहीत, त्याच यंत्रणेकडून नव्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होणार याची हमी कोण देणार?

# दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी १ लाख मदत द्या !

## अन्यथा सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करुन सोडणार, रविकांत तुपकरांचा इशारा



**बुलढाणा । प्रतिनिधी**

**सध्या राज्यातील बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण राज्यातील अनेक भागात चांगला पाऊस पडलेला नाही. खरीपाची पिकं वाया गेली आहेत. अशातच राज्य सरकारने नुकतीच राज्यातील १८ दुष्काळसदृश जिल्ह्यांची यादी जाहीर केली आहे. मात्र या यादीत बुलढाणा जिल्ह्याचा समावेश करण्यात न आल्यानं शेतकरी नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले आहेत. एसी केबिनमध्ये बसून दुष्काळाची यादी तयार करता? शेतकऱ्यांच्या बांधावर या आणि पिकांची अवस्था पाहा असे तुपकर म्हणाले. बुलढाण्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी देखील त्यांनी केली. तसेच हेक्टरी १ लाखांची मदत करावी, अन्यथा सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करुन सोडण्याचा इशारा देखील रविकांत तुपकरांनी दिला आहे.**

राज्य सरकारने नुकतीच राज्यातील १८ दुष्काळसदृश जिल्ह्यांची यादी जाहीर केली आहे. मात्र या यादीत बुलढाणा जिल्ह्याचा समावेश करण्यात न आल्याने शेतकरी नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले आहेत. बुलढाणा जिल्ह्यात गेल्या ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या पिकांची अक्षरशः होरपळ झाली आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्याला दुष्काळसदृश यादीतून वगळणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची संतप्त प्रतिक्रिया तुपकरांनी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### भारतीय व्यापारी जहाजावर हल्ला; १३ खलाशांची सुटका

मुंबई : ओमानच्या किनारपट्टीजवळ 'एमटी अल गैया' या व्यापारी जहाजावर रविवारी झालेल्या हल्ल्याचा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या जहाजावर एकूण १४ भारतीय खलाशी तैनात होते. त्यापैकी १३ भारतीयांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून, एका लापता भारतीय नागरिकाचा शोध सध्या सुरू आहे. या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता असलेल्या एका भारतीय नागरिकाचा शोध आणि बचाव कार्य सुरू आहे.
ओमानमधील भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून ओमानच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहे.
व्यापारी जहाजे, खलाशी, नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांवरील हल्ले अस्वीकार्य असल्याचे नमूद करत, भारताने तणाव कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलण्याचे तसेच संवाद व मुत्सद्देगिरीचा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. तसेच, या भागातील आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून मुक्त व सुरक्षित नौकानयन आणि व्यापाराची वाहतूक पूर्ववत करण्याचे आवाहनही भारताने केले. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, ही घटना घडताच मस्कत येथील भारतीय दूतावासाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत.
दूतावास ओमानच्या स्थानिक प्रशासनासोबत सतत संपर्कात असून शोध आणि बचाव कार्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

### पश्चिम बंगालमध्ये २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश

कोलकाता : पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील मदरसांवर मोठी कारवाई केली आहे. तब्बल २५२ मदरसे बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, सुमारे १०० इतर मदरसांना कारण दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. राज्यभरात केलेल्या सर्वेक्षणानंतर हा आदेश देण्यात आला आहे. या सर्वेक्षणात अशा अनेक संस्थांकडे आवश्यक मंजुरी आणि मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी आज (दि. १३ सप्टेंबर) दिली.
अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागाचे मंत्री क्षुदीराम टुडू यांनी स्पष्ट केले की, ज्या मदरसांकडे आवश्यक मंजुरी आहे, ते पूर्ववत सुरू राहतील.
विभागाने प्रत्यक्ष पातळीवर केले होते सर्वेक्षण जूनच्या सुरुवातीपासून पश्चिम बंगालमधील सर्व जिल्ह्यांमध्ये सरकारी आणि खाजगी मदरसांच्या पायाभूत सुविधा, मंजुरीची स्थिती आणि व्यवस्थापन प्रणालीचे मूल्यांकन करण्यासाठी विभागाने प्रत्यक्ष पातळीवर सर्वेक्षण केले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ज्या मदरसांना कारण दाखवा नोटीस देण्यात आली आहे, त्यांच्या उत्तरांची तपासणी केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. विविध जिल्ह्यांतील अधिकृत आणि अनधिकृत मदरसांची संख्या शोधण्यासाठी मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्या निर्देशानंतर हे काम सुरू करण्यात आले होते, असे टुडू यांनी सांगितले. मंत्री पुढे म्हणाले, ''२५२ मदरसे बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तर इतर १०० मदरसांना आवश्यक मंजुरी आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.''

# पोलिसांची परवानगी नसली तरी आंदोलन करणारच !

## सरकारला पुनर्विचार करून परवानगी द्यावीच लागेल'; जरांगे पाटील आक्रमक

**मुंबई । । प्रतिनिधी**



**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या मुंबई आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्याकडून आंदोलनासाठीचा परवानगी अर्ज फेटाळण्यात आला असून, गणेशोत्सवातील मोठा पोलीस बंदोबस्त, आझाद मैदानाची अपुरी क्षमता, मुंबईतील वाहतूक व जनजीवनावर होणारा परिणाम आणि कायदा–सुव्यवस्थेचा संभाव्य प्रश्न यांचा दाखला पोलिसांनी दिला आहे. मात्र, पोलिसांचा नकार असतानाही १९ सप्टेंबरपासून आंदोलन सुरू करण्याचा निर्धार जरांगे पाटील यांनी कायम ठेवला** आहे.

आंदोलनाच्या परवानगीसाठी शनिवारी दुपारी पोलिसांकडे अर्ज सादर करण्यात आला होता. या आंदोलनात हजारो मराठा बांधव सहभागी होणार असून आंदोलन शांततेच्या मार्गाने केले जाईल, असे अर्जात नमूद करण्यात आले होते. जरांगे यांच्या वतीने वीरेंद्र पवार यांनी आझाद मैदान पोलीस ठाण्यात जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मात्र, पोलिसांनी आंदोलनाला परवानगी ▶▶ पान २ वर

### 'तर दहा मिनिटांत महाराष्ट्र बंद'...

मुंबईतील आंदोलन शांततेच्या मार्गाने केले जाईल, असा शब्द देतानाच जरांगे यांनी आक्रमक इशाराही दिला आहे. आंदोलनादरम्यान आपल्या एखाद्या तरुणाचे रक्त सांडल्यास अवघ्या दहा मिनिटांत संपूर्ण महाराष्ट्र बंद करू, असा इशारा त्यांनी दिला आहे. मुंबईत येणे शक्य नसलेल्या मराठा बांधवांनी आपण ज्या मार्गाने जाणार आहोत, त्या मार्गावर दीडशे किलोमीटरपर्यंत सोबत चालावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### महिला भगिनींनी बाहेर पडावे...

मराठा भगिनींनीही घरात न थांबता मोठ्या संख्येने मुंबईत यावे, असे आवाहन जरांगे यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लताताई शिंदे यांना मराठा भगिनींनी आरक्षणाच्या मागणीचे हळदी–कुंकू लावून ही मागणी त्यांच्यापर्यंत पोहोचवावी, अशी सादही त्यांनी घातली आहे.

# आ. संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल !

**बुलढाणा । प्रतिनिधी**



भाजप आ. श्वेता महाले आणि एकनाथ शिंदे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर गायकवाड यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. एका ४२ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ अंतर्गत हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. बुलढाण्यातील या प्रकरणामुळे भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेना यांच्यातील स्थानिक राजकीय संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे.

चिखली मतदारसंघाच्या भाजप आमदार श्वेता महाले यांचे पती विद्याधर महाले यांचा वाढदिवस मित्रपरिवाराने बुलढाणा शहरात मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. यावेळी एक रॅली काढण्यात आली होती. त्या रॅलीत 'बाप तो बाप रहेगा.' अशा प्रकारे गाणेही वाजवण्यात आले होते. या गाण्यावर आमदार संजय गायकवाड यांनी, 'बाप तो बाप है हे ठीक आहे. मात्र हे विधान एखाद्या ▶▶ पान २ वर

# २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू होणार...!

## मुंबईत अमित शहा यांची मोठी घोषणा



**मुंबई । प्रतिनिधी**

२०२९ पूर्वी देशात समान नागरी कायदा आणणार असल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज (दि. १३ सप्टेंबर ) मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी केली. भाजप सरकारने रक्ताचा एकही थेंब न सांडता कलम ३७० हटवलं आहे. देशात घुसखोरी करणाऱ्यांना शोधून देशाबाहेर काढणार असा स्पष्ट इशारा गृहमंत्री शहा यांनी दिला असून, देशातील माओवादाचा पूर्ण खात्मा करून देशाला माओवादापासून मुक्त केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, ''आम्ही अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायदा () लागू केला आहे. मला खात्री आहे की, २०२९ पूर्वी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये आम्ही समान नागरी कायदा लागू करू. सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि 'ऑपरेशन सिंदूर' यांसारख्या मोहिमांमुळे दहशतवादाबाबत 'झिरो टॉलरन्स'चे (मुळीच ▶▶ पान २ वर

# माजलगाव तालुक्यात दलीत तरुणाला रिंगण करून मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिवरा येथील सिद्धांत अवघडे अल्पवयीन तरुण मोटरसायकलवरुन गावाकडे जात असताना सावरगाव येथे मोटरसायकलला कट मारल्याच्या करनावरुन लाथाबुक्क्यांनी आणी चामड्याच्या बेल्टने टोळक्याने मारहाण केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारीत झाल्यानंतर याप्रकरणी दि १३ सप्टेंबर रविवार रोजी ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधित



टोळक्यावर अनुसूचित जाती आत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव तालुक्यातील हिवरा येथील सिध्दांत आवघडे हा दलीत तरुण दि १३ सप्टेंबर रविवार रोजी दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव कडुन सावरगाव मार्ग हिवऱ्याकडे मोटरसायकलवर जात असताना सावरगाव येथे मोटरसायकलचा कट मारल्याच्या करनावरुन टोळक्याने लाथाबुक्क्यांनी व चामड्याच्या बेल्टने मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर ▶▶ पान २ वर

# राघव चड्डाप्रकरणात पाच महिन्यानंतर केजरीवाल बोलले

**दिल्ली । वृतसंस्था**

आप'चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी, राघव चड्ढा आणि संदीप पाठक यांच्यासह 'आप'च्या सात राज्यसभा खासदारांनी पक्ष सोडल्याच्या घटनेवर पहिल्यांदाच भाष्य केले आहे. चड्ढा यांचे नाव न घेता, त्यांनी टोला लगावत म्हटले की, आता कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी त्यांच्या विश्वासार्हतेची १०० वेळा तपासणी केली जाईल. केजरीवाल म्हणाले की, आम आदमी पक्षात पक्ष सोडण्याच्या अशा घटना घडत नाहीत. त्यांनी भाजपमध्ये सामील झालेल्या राज्यसभा खासदारांवर निशाणा साधत म्हटले की, आता कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची १०० वेळा तपासणी केली जाईल. त्यांनी या घटनेला दुर्दैवी म्हटले.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी, राघव चड्ढा यांच्यासह पक्ष सोडून गेलेल्या सात राज्यसभा खासदारांवर निशाणा साधत म्हटले की, आम आदमी पक्षाने ▶▶ पान २ वर

# 'गलवान' ते 'व्यापार तूट'; पंतप्रधान मोदी चीनसमोर झुकले?

## काँग्रेसकडून प्रश्न उपस्थित करीत मोदी सरकारवर टीका

**दिल्ली । वृतसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील द्विपक्षीय शिखर परिषदेनंतर, काँग्रेसचे महासचिव (संपर्क) आणि खासदार जयराम रमेश यांनी केंद्र सरकारला चीनसोबतच्या संबंधांबाबत चार प्रश्न विचारले. त्यांनी पंतप्रधानांकडून गलवान खोऱ्यातील घटना, पूर्व लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील सीमा प्रश्न,



ऑपरेशन सिंदूरमधील चीनची भूमिका आणि भारत–चीन व्यापार तूट यावर उत्तरांची मागणी केली.

जयराम रमेश म्हणाले की, चीनसोबत संबंध सामान्य करणे ही एक गोष्ट आहे, परंतु सरकारने राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंधांशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर भारताची भूमिका स्पष्ट करावी. त्यांनी पंतप्रधानांनी राष्ट्रासमोर या चार प्रश्नांची उत्तरे द्यावीत अशी मागणी केली. १५–१६ जून २०२० च्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,६४१ | ३,४४९ | २,८२९ |
| ज्वारी/हायब्रिड: १०१.५० क्विंटल | २,७०२ | ५,३३१ | ३,६७८ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,००० | ८,००० | ७,००० |
| उडीद :२२.५० क्विंटल | ७,८०० | ८,५८० | ८,१७७ |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | २,३०० | २,९५७ | २,७९९ |
| मुग: २२.०० क्विंटल | ५,००० | ९,६५० | ८,९०७ |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ५,५०० | ५,७९० | ५,६४५ |
| हरभरा: १७.५० क्विंटल | ५,४०० | ६,२०० | ५,८५८ |

# 'लाल परी'च्या ताफ्यात आता ५ हजार नवीन बसेस येणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**सामान्य प्रवाशांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस ताफ्याला आता आधुनिकतेची नवी झळाळी मिळणार आहे. त्याच दिशेने ५ हजार 'लालपरी' बसेसच्या खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

या निविदा प्रक्रियेत सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्सने सादर केला आहे. त्यामुळे बसेसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. मंत्री सरनाईक



म्हणाले की, नव्या ५,००० 'लालपरी' बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला मोठी बळकटी मिळणार आहे. नव्या बसेसमुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल, बसफेऱ्यांची उपलब्धता वाढविणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगली सेवा देता येईल. जुन्या व गळक्या बसेस तसेच प्रवासादरम्यान बसेस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे प्रभावीपणे मात करता येणार आहे. पुढील सहा महिन्यांत सुमारे ५,००० हून अधिक बसेस प्रवासी सेवेतून कालबाह्य होऊन भंगारात जाणार आहेत. सध्या महामंडळाला नाईलाजास्तव १२ ते १४ वर्षे जुन्या झालेल्या बसेसची दुरुस्ती करून त्यांचा प्रवासी सेवेसाठी वापर करावा लागत आहे. या बसेस सातत्याने रस्त्यात नादुरुस्त होत असल्याने ▶▶ पान २ वर

### मागेल त्याला बस

सध्या एसटीकडे बसेसची कमतरता असल्याने अनेक शालेय फेऱ्या अचानक रद्द करणे, ग्रामीण भागातील मुक्कामी बसेस उपलब्ध न होणे, अशा कटू प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. नव्या ५,००० बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर 'मागेल त्याला बसफेरी' उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बसफेरीचा फायदा झाला नाही तरी चालेल; मात्र बसफेरीची मागणी करणाऱ्यांनी ती फेरी तोट्यात चालणार नाही, याची हमी घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

cmyk

## अग्रलेख

# टास्क फोर्सच्या शिफारशी की पुन्हा एकदा कागदी मलमपट्टी?

## एमपीएससी परीक्षा सुधारणांवर थेट सवाल; प्रश्नपत्रिका फुटणार नाही याची हमी कोण देणार?

महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भवितव्याशी संबंधित एमपीएससी परीक्षा व्यवस्था वारंवार संशयाच्या भोवऱ्यात सापडत असताना सरकारने टास्क फोर्सच्या माध्यमातून परीक्षा सुधारणांच्या काही शिफारशी पुढे केल्या आहेत. प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार करणे, परीक्षांचे वेळापत्रक किमान एक वर्ष आधी जाहीर करणे आणि परीक्षेपूर्वी रिक्त पदांची संख्या स्पष्ट करणे, या उपाययोजना वरकरणी आकर्षक वाटतात. पण मूळ प्रश्न असा आहे की, ज्या यंत्रणेकडून आधीच्या परीक्षा सुरक्षितपणे घेता आल्या नाहीत, त्याच यंत्रणेकडून नव्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होणार याची हमी कोण देणार?

पेपरफुटी हा केवळ प्रश्नपत्रिका बाहेर जाण्याचा प्रकार नाही. तो संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा भंग आहे. एखादा विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतो, पालक त्यासाठी पैसा खर्च करतात, वयाची महत्त्वाची वर्षे स्पर्धेत घालवली जातात आणि ऐनवेळी पेपरफुटी किंवा परीक्षा रद्द झाल्याची बातमी येते. त्यावेळी नुकसान केवळ आर्थिक नसते; विद्यार्थ्यांचा वेळ, मानसिक तयारी आणि भविष्यातील संधीही धोक्यात येतात. त्यामुळे सरकारने टास्क फोर्सच्या शिफारशी जाहीर करण्यापेक्षा यापूर्वीच्या अपयशाची जबाबदारी कोणाची, हे आधी स्पष्ट करायला नको का? ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार करणे म्हणजे सुरक्षा हमी नव्हे प्रश्नपत्रिका शेवटच्या क्षणी तयार करण्याचा प्रस्ताव पेपरफुटी रोखण्याचा तांत्रिक उपाय म्हणून मांडला जात आहे. मात्र प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून ती परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत अनेक टप्पे असतात. प्रश्ननिर्मिती करणारे तज्ज्ञ, डिजिटल प्रणाली, सर्व्हर, छपाई, वाहतूक, वितरण आणि परीक्षा केंद्रावरील प्रक्रिया प्रत्येक ठिकाणी मानवी हस्तक्षेप असतो. मग प्रश्न असा की, गळतीचा धोका नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, याचे स्वतंत्र ऑडिट झाले आहे का? प्रत्येक टप्प्यावर डिजिटल लॉग ठेवला जाणार आहे का प्रश्नपत्रिकेपर्यंत कोणाला आणि किती वेळ प्रवेश होता, याची नोंद सार्वजनिक केली जाणार का? एखादी गळती झालीच तर जबाबदार अधिकारी निश्चित करण्याची व्यवस्था आहे का? 'ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार' हा शब्दप्रयोग ऐकायला आधुनिक आहे; पण त्यामागे सक्षम सुरक्षा यंत्रणा नसेल, तर जुन्या समस्येला नवे नाव देण्यापलीकडे त्याचे महत्त्व उरणार नाही. एमपीएससी परीक्षांचे वेळापत्रक किमान एक वर्ष आधी जाहीर करण्याची शिफारस विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची आहे. मात्र महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा अनुभव असा आहे की वेळापत्रक जाहीर होणे आणि त्या तारखेला परीक्षा होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सरकार आणि आयोगाने आता एक प्रश्न स्पष्टपणे स्वीकारायला हव. जाहीर केलेल्या तारखेला परीक्षा झाली नाही तर जबाबदार कोण? वारंवार परीक्षा पुढे ढकलल्यास विद्यार्थ्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई कशी होणार? वयाची मर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांचे काय? एका परीक्षेच्या अनिश्चिततेमुळे पुढील अनेक परीक्षांचे नियोजन बिघडते, याची प्रशासनाला जाणीव आहे का? विद्यार्थ्यांना आश्वासन नको; निश्चित तारीख आणि त्या तारखेचा सन्मान हवा आहे. परीक्षेपूर्वी रिक्त पदांची संख्या जाहीर करण्याची शिफारसही स्वागतार्ह आहे. पण येथेही सवाल आहे. जाहीर केलेली पदसंख्या नंतर बदलली तर त्याचे कारण काय? विभागांकडून मागणीपत्रे वेळेत न आल्याने वर्षानुवर्षे पदे रिक्त राहणार असतील, तर एमपीएससी परीक्षा वेळेवर घेऊनही उपयोग काय? सरकारी विभागांनी रिक्त पदांची माहिती देण्याची कायदेशीर आणि कालबद्ध जबाबदारी निश्चित केली जाणार आहे का? पदसंख्या कमी-जास्त करण्यासाठी पारदर्शक निकष असतील का? विद्यार्थ्यांना ही माहिती एका अधिकृत, सार्वजनिक डिजिटल प्रणालीवर उपलब्ध करून दिली जाणार का? टास्क फोर्सचा अहवाल पुरेसा नाही टास्क फोर्सने १५ दिवसांत शिफारशी केल्या म्हणून प्रश्न सुटत नाही. खरी कसोटी अहवालानंतर सुरू होते. प्रत्येक शिफारशीची अंमलबजावणी कधी होणार, त्यासाठी जबाबदार अधिकारी कोण, निधी किती आणि प्रगतीचा सार्वजनिक अहवाल कधी प्रसिद्ध होणारयाची स्पष्ट रूपरेषा सरकारने जाहीर केली पाहिजे. अन्यथा समिती नेमली, बैठक झाली, शिफारशी झाल्या आणि काही दिवसांनी विषय पुन्हा फाईलमध्ये गेला, अशी महाराष्ट्राच्या प्रशासनातील परिचित कथा पुन्हा घडू शकते. सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो उत्तरदायित्वाचा. पेपरफुटी झाली तर केवळ परीक्षा रद्द करणे आणि विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायला लावणे हा उपाय नाही. प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतील दोष निश्चित होणे आणि दोषींवर वेगाने कारवाई होणे आवश्यक आहे. पेपरफुटीच्या प्रकरणात कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीला, संस्थेला किंवा एजन्सीला संरक्षण मिळणार नाही, याची स्पष्ट हमी सरकार देणार आहे का? तपास पूर्ण होण्याची कालमर्यादा काय? दोष सिद्ध झाल्यास संबंधितांना भविष्यात परीक्षा व्यवस्थेपासून दूर ठेवण्याची व्यवस्था आहे का? विद्यार्थ्यांना सर्वांत आधी हेच पाहायचे आहे की नियम त्यांच्यासाठीच आहेत की नियम मोडणाऱ्यांसाठीही आहेत. एमपीएससी परीक्षा व्यवस्था ही केवळ सरकारी भरतीची यंत्रणा नाही; ती महाराष्ट्रातील सामान्य कुटुंबातील तरुणांसाठी सामाजिक आणि आर्थिक उन्नतीचा मार्ग आहे. हा मार्ग जर पैशाने, ओळखीने, गळतीने किंवा प्रशासकीय निष्काळजीपणाने दूषित होत असेल, तर त्याचा फटका संपूर्ण समाजाला बसतो. म्हणून टास्क फोर्सच्या शिफारशींकडे केवळ सुधारणा म्हणून पाहून चालणार नाही. प्रत्येक शिफारशीला कालमर्यादा, जबाबदार अधिकारी, सार्वजनिक अहवाल आणि अपयशाची निश्चित जबाबदारी जोडली गेली पाहिजे. प्रश्नपत्रिका ऐनवेळी तयार होईल, वेळापत्रक वर्षभर आधी जाहीर होईल, रिक्त पदांची संख्या सांगितली जाईल. हे सर्व कागदावर छान दिसते. पण परीक्षा फुटली नाही, वेळेत झाली, निकाल वेळेत लागला आणि दोषींना शिक्षा झाली, तेव्हाच सुधारणा झाल्या असे म्हणता येईल. अन्यथा टास्क फोर्सच्या शिफारशी हा तरुणांच्या जखमेवरचा उपचार नसून जुन्याच व्यवस्थेवर केलेली नवी कागदी मलमपट्टी ठरेल. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आता घोषणा नकोत; त्यांना एकच गोष्ट हवी आहे. गुणवत्तेवर विश्वास ठेवा, व्यवस्था तुमच्याशी प्रामाणिक राहील' याची प्रत्यक्ष हमी हवी आहे.

# खासगी कोचिंग क्लासेसच्या संचालकांची मनमानी संपणार!

## अधिवेशनात येणाऱ्या कडक कायद्यामुळे संचालकांचे धाबे दणाणले

**मंठा । प्रतिनिधी**

**खासगी कोचिंग क्लासेसकडून विद्यार्थ्यांची होणारी आर्थिक लूट, संचालकांची मनमानी आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी राज्य सरकारकडून कठोर पावले उचलली जात असून आगामी हिवाळी अधिवेशनात खासगी कोचिंग क्लासेससाठी स्वतंत्र कडक कायदा आणण्याची तयारी शासनाकडून सुरू आहे.**

सध्या मंठा शहरात कोचिंग क्लासचे पेव फुटले असून मोठमोठे होल्डिंग लावून विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याची स्पर्धा कोचिंग क्लासेस संचालकांमध्ये सुरू असल्याचे दिसून येते. त्यांच्या या मनमानीला आता चाप बसणार असून शासनाच्या प्रस्तावित कायद्यानुसार कोचिंग संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी, नियमित तपासणी, शुल्काबाबत पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे बंधनकारक होण्याची शक्यता आहे. तसेच खोट्या किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिराती करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. कोचिंग क्लासमधून दिल्या जाणाऱ्या सुविधा, निकाल आणि आकारले जाणारे शुल्क यामध्ये तफावत असल्याच्या तक्रारी पालकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे कोचिंग क्लासेसच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र नियामक कायदा शासनाच्या विचाराधीन आहे. प्रस्तावित नियमांनुसार कोचिंग क्लासेसना विद्यार्थी शुल्क, अभ्यासक्रम, सुविधा, शिक्षकांची माहिती तसेच निकालासंदर्भातील अचूक माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. तसेच स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा आणि विविध अभ्यासक्रमांच्या नावाखाली विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी खोटे दावे करणाऱ्या कोचिंग संस्थांवर कठोर कारवाई करण्याची शासनाची तयारी आहे. त्यामुळे आगामी काळात मनमानी करणाऱ्या कोचिंग क्लासेसच्या संचालकांना निश्चितच चाप बसेल असे बोलले जाते.

# आदर्श शिक्षण संस्था पतपेढी आणि श्री गजानन बँकेची संयुक्त सर्वसाधारण सभा संपन्न

## समुद्राला वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला मिळावे ही मागणी लावून धरली-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीची ४३ वी आणि श्री गजानन नागरी सहकारी बँकेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संयुक्तपणे संपन्न झाली.**




या दोन्ही संस्थांच्या उत्कृष्ट आणि पारदर्शक कारभारामुळे ग्राहकांचा विश्वास दुणावला असून, ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या आर्थिक वर्षासाठी पतपेढीमार्फत १२%, तर बँकेमार्फत ५% लाभांश वाटप करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या सभेत घेण्यात आल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. सभेच्या सुरुवातीला पतपेढीचा अहवाल प्राचार्य थिटे ए. एस. यांनी, तर बँकेचा अहवाल प्रा.जगदीश काळे यांनी वाचून दाखवला. यावेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, संस्थेचा उद्देश केवळ नफा कमवणे नसून, आपली संस्था सक्षम ठेवून लोकांना मदत करणे हे ध्येय ठेवून कारभार केल्यास मोठा विश्वास निर्माण होतो. बँकेच्या माध्यमातून अनेकांना रोजगार निर्मितीसाठी सहकार्य केले जात आहे. आजच्या काळात सगळेच व्यवहार रोखीचे आणि पारदर्शक झाले आहेत. कोण, कुठे, कसा पैसा ठेवतो आणि गुंतवणूक करतो, हे लगेच समजते. या बदलत्या परिस्थितीतही दोन्ही संस्थांनी लोकांचा विश्वास संपादन करण्याचे काम चोखपणे बजावले आहे. मराठवाड्याच्या ज्वलंत पाणी प्रश्नावरही सविस्तर भाष्य केले, जायकवाडी धरणात सध्या २२ टीएमसी गाळ साचला आहे. दुष्काळ हा मराठवाड्याच्या पाचवीलाच पुजलेला आहे. सप्टेंबर महिना अर्धा संपत आला तरी पावसाने म्हणावी तशी हजेरी लावली नाही, त्यामुळे पाण्याची चिंता कायम आहे. मात्र, मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. समुद्राला वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात वळवण्याची जी मागणी आपण सातत्याने करत आहोत, ती प्रक्रिया आता पूर्णत्वास जाऊ लागली आहे. तब्बल २२ हजार कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भावी पिढीसाठी मोठा आश्वासक ठरणार आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करत असताना असे अनेक प्रश्न प्राधान्याने सोडवण्यावर आपला भर आहे. बदलत्या काळात मुलांच्या भविष्यासाठी त्यांना उच्चशिक्षित करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले, सभेला ह.भ.प.ओंकार महाराज वाघमारे, विलास बडगे, गंगाधर घुमरे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, अरूण डाके, मुखीद लाला, सुधाकर मिसाळ, अरूण बोंगाणे, कल्याण खांडे, अर्जुन बहीरवाळ, अरूण गोरे, बाबूराव केदार, बबन चौधरी, साई शेलार, सोमनाथ माने, शरद ढाकणे, दिलीप शेळके, ओमप्रकाश खवतड, अंकुश राठोड, सुलेमान पठाण, विजय सरवदे, चंद्रकांत पेंढारे, सुभाष क्षीरसागर, प्रभाकर सानप, दादासाहेब मुंडे, नवनाथ कुलकर्णी, प्रकाश इंगळे, डॉ.अरूण भस्मे, डॉ.राजा मचाले, योगेश पवार, एम.ए.राऊत यांच्यासह दोन्ही संस्थांचे संचालक, सभासद, ठेवीदार आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पान १ वरून...

### दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी

दिली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीचा निर्णय मंत्रालयातील एसी केबिनमध्ये बसून कागदावर घेतला जात असल्याचा आरोप करत तुपकरांनी सरकार आणि प्रशासनावर जोरदार निशाणा साधला. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली असती तर केवळ १८ नव्हे, तर महाराष्ट्रातील अनेक जिल्हे दुष्काळसदृश यादीत आले असते. शेतकऱ्यांना कमीत कमी मदत द्यावी लागावी म्हणूनच ही यादी तयार करण्यात आली आहे का?'' असा सवाल रविकांत तुपकरांनी उपस्थित केला.

---------------

### आ. संजय गायकवाड

पुरुषाने केलं तर चालेल, मात्र एखाद्या बाईने म्हटलं बाप तो बाप आहे तर बापाचं शरीर आणणार कुठून.?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. आ. संजय गायकवाड यांनी केलेल्या वक्तव्यावरून आता वाद निर्माण झाला आहे. या वक्तव्यामुळे महिलांच्या सन्मानाला आणि लज्जेला धक्का पोहोचल्याचा आरोप करत एका महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून मध्यरात्री संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना मुख्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवाने रॅली काढून वाढदिवस साजरा केला, याचं मला फार वाईट वाटलं. मी जर एखाद्या शेतकऱ्याला मदत केली तर तुम्हीही मदत द्या. वाढदिवसाला खर्च करण्यापेक्षा एखाद्या गरीबाला मदत करा. आम्ही अशी उधळपट्टी कधी करत नाही. आमचेही वाढदिवस होतात, पण आम्ही एवढा कधी खर्च करत नाही. बाप तो बाप रहेगा, हे माणसाने बोललं तर बरं आहे. एखाद्या बाईने म्हटले की मी बाप आहे तर बापासारखे शरीर कुठून आणणार आहे. हे शोभते का बोलायला. मग राजकारणातला बाप कोण आहे हे योग्यवेळी आम्ही दाखवून देऊ,'' असा इशारा आमदार संजय गायकवाड यांनी श्वेता महाले यांना दिला होता. या प्रकरणावर भाजप आमदार श्वेता महाले यांनी प्रतिक्रिया देताना गायकवाडांवर थेट निशाणा साधला. 'महिलांच्या शरीरावर बोलणे हा गुन्हा आहे. तुम्ही आमदार असलात तरी संविधानाने तुम्हाला असे बोलण्याचा अधिकार दिलेला नाही. कोण आहे बाप? माझ्यासाठी जनता-जनार्दन ही मायबाप आहे,' असे म्हणत महाले यांनी गायकवाडांना प्रत्युत्तर दिले.

---------------

### पोलिसांची परवानगी नसली तरी

देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, १४ सप्टेंबरपासून मुंबईत गणेशोत्सवाला सुरुवात होत असल्याने मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागणार आहे. अशा परिस्थितीत मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत दाखल झाल्यास सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर सुप्रीम कोर्टातील अमित सहानी प्रकरणातील आदेश, मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश तसेच 'जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम २०२५'मधील कलम ४६(५) आणि ४६(६) यांचा आधार घेत आझाद मैदानात आंदोलनास परवानगी देता येणार नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलनासाठी सुमारे चार ते साडेचार हजार आंदोलक येणार असल्याचे सांगितले आहे. मात्र, एवढ्या मोठ्या संख्येने आंदोलकांना आझाद मैदानात सामावून घेणे शक्य नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. यापूर्वी २०२४ मध्ये झालेल्या आंदोलनामुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्था, शाळा, व्यवसाय आणि रुग्णालयांच्या कामकाजावर परिणाम झाल्याचा दाखला पोलिसांनी दिला आहे. त्यामुळे यंदाही आंदोलनामुळे मुंबईचे जनजीवन विस्कळीत होण्याची भीती पोलिसांनी व्यक्त केली आहे. २०२४ मधील आंदोलनात सुमारे पाच हजार आंदोलक सहभागी झाले होते. त्यावेळी काही आंदोलकांवर गुन्हेही दाखल करण्यात आले होते. तसेच अर्जदाराकडून यापूर्वी मुंबई बंदचे आवाहन करण्यात आल्याने आंदोलनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे पोलिसांनी नमूद केले आहे. या सर्व बाबींचा विचार करून १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानात प्रस्तावित असलेल्या आंदोलनास परवानगी नाकारण्यात आली आहे. दरम्यान, पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर मनोज जरांगे पाटील अधिक आक्रमक झाले आहेत. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून आंदोलनाला परवानगी द्यावीच लागेल, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. तसेच 'आतापासून सलाईन आणि पाणी देखील बंद करत आहे. १९ सप्टेंबरला आंदोलन होणारच', असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ही शेवटची आणि आरपारची लढाई असल्याचे सांगत जरांगे यांनी १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. १९ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा त्यांचा निर्धार आहे. या लढाईचे साक्षीदार होण्यासाठी संपूर्ण मराठा समाजाने मोठ्या संख्येने मुंबईत दाखल व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. पोलिसांकडून आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आल्याने आता जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम राहतात की सरकारकडून परवानगीबाबत तोडगा काढला जातो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. विशेषतः १५ सप्टेंबरपासून सुरू होणारा मुंबईकडेचा मराठा मोर्चा आणि १९ सप्टेंबरला प्रस्तावित उपोषण यामुळे आगामी काही दिवसांत राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

----------------

### माजलगाव तालुक्यात दलीत तरुणाला

व्हायरल झाल्याने व्हिडिओतील मारहाण करणाऱ्या टोळक्यार फिर्यादी सिध्दांत सिताराम अवघडे यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.रं क्र. ०४०३/२०२६ अन्वये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हि.ए) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११५(२),३(५) व ३५२ अंतर्गत आरोपी अभिमन्यू प्रल्हाद जगताप,बबलु जगताप,आगंद नाईकनवरे, अविनाश जोडगे,रा.सावरगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी आनंत्रे हे करत आहेत.

---------------

### २०२९ पूर्वी समान नागरी कायदा

खपवून न घेण्याचे) धोरण प्रस्थापित झाले आहे, तसेच विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे, असा पुन्नरुच्चारही शहा यांनी केला. जेन 'झी''च्या नेतृत्वाखालील आंदोलनाचे सामाजिक आणि राजकीय परिणामबाबत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, ''आपण लोकशाहीत आहोत. विविध मुद्द्यांवर लोकांची मते भिन्न असू शकतात आणि ती मते मांडली जाणे आवश्यक आहे. भारतीय जनता पक्ष सत्तेवर आहे, पण आम्ही आणीबाणी लादून राज्यकारभार करू शकत नाही. ती काँग्रेसची संस्कृती आहे, आमची नाही. आमचा संवाद आणि चर्चेवर विश्वास आहे,'' असेही अमित शहा यांनी यावेळी सांगितले. यावेळी भाजप आणि एनडीए हा देश आणि जनतेसाठी कटिबद्ध असल्याचे सांगताना, १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या काळात सेवा अभियान राबविणार असल्याची माहिती देण्यात आली. भाजप आणि एनडीए ही एकाच ध्येयाने काम करणारी व्यवस्था आहे. देशात घुसखोरी करणाऱ्यांना शोधून देशाबाहेर काढणार असा स्पष्ट इशारा गृहमंत्री शहा यांनी दिला असून, देशातील माओवादाचा पूर्ण खात्मा करून देशाला माओवादापासून मुक्त केले असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, ''मातृभाषेला प्राधान्य देणे हे आमच्या सरकारचे धोरण आहे आणि संविधानानेही यासंदर्भात राज्यांना विशिष्ट निर्देश दिले आहेत. मला वाटत नाही की हा काही मोठा मुद्दा बनेल. काही व्यक्तींनी तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास क्वचित प्रसंगी काही घटना घडू शकतात, परंतु राज्यांकडे अनुभवी नेतृत्व आहे आणि अशा समस्या सोडवण्याचा मार्ग ते नक्कीच शोधून काढतील.'' २०१४ पूर्वीचे देशातील राजकारण हे भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीने ग्रासलेले होते. २०१४ ते २०२६ या राजकीय कालखंडात, देश या समस्यांच्या पलीकडे जाऊन 'कामगिरीवर आधारित राजकारणा'कडे वळला आहे. गेल्या १२ वर्षांत पहिल्यांदाच जनतेने कणखर परराष्ट्र धोरण अनुभवले आहे. आपले संरक्षण धोरण असो वा परराष्ट्र धोरण, 'भारत प्रथम' हेच त्यामागील मार्गदर्शक तत्त्व राहिले आहे. भारताचे हित आमच्यासाठी सर्वोच्च असल्याचेही शहा यांनी सांगितले.

**१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान'**

भाजपआणि आमचे मित्रपक्ष १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबवत आहेत. या मोहिमेद्वारे, आम्ही या प्रेरणादायी २५ वर्षांच्या प्रवासाची कथा, त्याची उद्दिष्टे, यश आणि भविष्यासाठीचा आमचा संकल्प देशासमोर मांडणार आहोत. सेवेला जीवनशैली बनवणे आणि संघटनेला लोकसहभाग व जनहित साधण्याचे माध्यम बनवणे, हे याचे उद्दिष्ट आहे. यात बारा विविध प्रकारचे कार्यक्रम तसेच बूथ, तहसील आणि जिल्हा स्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या शेकडो इतर उपक्रमांचा समावेश आहे... तसेच, 'नमो सेवा'च्या अशा क सादर केल्या जातील ज्यामध्ये स्थानिक भाषांमधील संगीत आणि नाट्य सादरीकरणांचा समावेश असेल आणि हे कार्यक्रम देशभरातील गावागावांत पोहोचवले जातील,'' अशी माहितीही यावेळी अमित शहांनी दिली.

---------------

### 'गलवान' ते 'व्यापार तूट'; पंतप्रधान मोदी

रात्री, गलवान खोऱ्यात चिनी सैनिकांशी झालेल्या समोरासमोरच्या लढाईत आपल्या २० जवानांनी सर्वोच्च बलिदान दिले. ४५ वर्षांत सीमेवर झालेली ही पहिलीच जीवितहानी होती. अवघ्या चार दिवसांनंतर, १९ जून २०२० रोजी, तुम्ही कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय सर्वपक्षीय बैठकीत सांगितले की, आमच्या हद्दीत कोणीही घुसले नव्हते किंवा आत कोणीही नव्हते. हे विधान आजपर्यंत मागे घेण्यात आलेले नाही. यामुळे त्यानंतरच्या वाटाघाटींमध्ये भारताची स्थिती लक्षणीयरीत्या कमकुवत झाली नाही का? पूर्व लडाखच्या मोठ्या भागांमध्ये आमचे पारंपरिक गस्त घालण्याचे आणि चराईचे हक्क शांतपणे पण निश्चितपणे सोडून दिले गेले आहेत. दरम्यान, अरुणाचल प्रदेशात चिनी घुसखोरीचे वृत्त समोर आले आहे. काही भारतीय गस्त चौक्यांपर्यंतचा प्रवेश बंद होणे आणि नवीन तणावाचा समावेश आहे. अरुणाचल प्रदेशबाबत चीनची भूमिका आणखी कठोर झाली आहे. ते शहरांची आणि ठिकाणांची नावे बदलत आहे, ज्याला ते दक्षिण तिबेट म्हणतात त्यावरील आपला दावा पुन्हा मांडत आहे. ब्रह्मपुत्रेच्या ग्रेट बेंडवरील ६०,०००-मेगावॅट क्षमतेच्या मेडोग महा-धरणाचे काम वेगाने पुढे नेत आहे. हा प्रकल्प चीनला आपल्या संपूर्ण ईशान्य भारताच्या जलसुरक्षेवर अत्यंत मजबूत नियंत्रण मिळवून देऊ शकतो.४ जुलै, २०२५ रोजी, लष्कराचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल राहुल सिंग यांनी जाहीरपणे सांगितले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानला मदत करण्यात चीनची भूमिका सखोल आणि निर्णायक होती. परंतु अचानक, २५ ऑगस्ट, २०२६ रोजी, माजी संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी एका व्याख्यानात, ज्या संस्थेशी स्वतः राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जवळून संबंधित आहेत, त्या संस्थेबद्दल अगदी वेगळे मत मांडले. उद्याच्या बैठकीपूर्वी वातावरण बदलण्याच्या रणनीतीचा हा भाग होता का? भारताची चीनसोबतची व्यापार तूट २०२५/२६ मध्ये विक्रमी ११२.६ अब्ज डॉलर्सवर पोहोचली, ज्यामुळे आपल्या उद्योगाचा, विशेषतः एमएसएमईचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला. अत्यावश्यक कच्चा माल, उत्पादन घटक आणि मध्यवर्ती वस्तूंसाठी चीनवरील आपले अवलंबित्व धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'चीनमधून आयात' या आता एकाच नाण्याच्या दोन बाजू बनल्या आहेत. ही अस्वीकार्य परिस्थिती बदलण्याचा आराखडा कुठे आहे? असे प्रश्न उपस्थित करून काँग्रेसने मोदी सरकारवर टीका केली आहे.

----------------

### राघव चड्डाप्रकरणात पाच

त्यांना राज्यसभेत पाठवले होते, लोकांनी नाही. त्यांनी चड्ढा, संदीप पाठक आणि इतर पाच राज्यसभा खासदारांवर पक्षाशी गद्दारी केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, 'आप'ने कोणाशीही गद्दारी केली नाही, पण या लोकांनी पक्षाशी गद्दारी केली आहे. याला एक धडा संबोधत ते म्हणाले की, हा आम आदमी पक्षासाठी एक राजकीय धडा आहे हे त्यांना समजले आहे. ते म्हणाले, ''राज्यसभेतील आम आदमी पक्षासाठी हा एक धडा होता. आता, कोणालाही राज्यसभेत पाठवण्यापूर्वी, ती व्यक्ती पात्र आहे की नाही हे पाहण्यासाठी आम्ही १०० वेळा कसून चौकशी करू.'' राघव चड्ढा एप्रिल २०२६ मध्ये भाजपमध्ये सामील झाले. त्यांच्यासोबत 'आप'च्या इतर सात राज्यसभा खासदारांनीही भाजपमध्ये सामील होण्याची घोषणा केली. भाजपमध्ये सामील झाल्यावर, राघव चड्ढा यांनी 'आप'वर आपली तत्त्वे आणि सचोटी सोडून भरकटल्याचा आरोप केला. त्यांनी 'आप'ला एक ''विषारी कार्यस्थळ'' म्हटले. 'आप'मध्ये आपला आवाज दाबला गेला आणि आपल्या मतांकडे दुर्लक्ष केले गेले, असे ते म्हणाले. चड्ढा यांनी, 'आप'च्या सात राज्यसभा खासदारांसह (दोन-तृतीयांश बहुमत), एका पत्रकार परिषदेत पक्षाचा राजीनामा दिला आणि पक्षांतरबंदी कायदा टाळला. मात्र, त्यावेळी आम आदमी पक्षाने यावर आक्षेप घेतला होता.

-------------

### 'लाल परी'च्या ताफ्यात आता

प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. चालकांनाही अशा जुन्या बसेस चालविताना मोठी कसरत करावी लागते. या सर्व समस्यांना लवकरच पूर्णविराम मिळणार आहे. एसटी महामंडळाने यापूर्वीच बसताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. २ बाय २ आसन व्यवस्थेच्या २,६४० 'लालपरी' बसेस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या ३,००० 'राजमाता जिजाऊ' बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नव्या बसेसच्या समावेशामुळे एसटीचा ताफा अधिक तरुण, सक्षम आणि प्रवाशांच्या गरजांशी सुसंगत होत आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६





## रसिक मंडळाची ही स्पर्धा म्हणजे एक स्वरहोत्रच – राजेसाहेब कदम

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ रसिक मंडळाने चालवलेला हा उपक्रम म्हणजे एक स्वरहोत्रच असून, नवोदित गायकांच्या सादरीकरणाला दिलेली ही नांदी ठरते, असे प्रतिपादन या स्पर्धेचे उद्घाटक राजेसाहेब कदम यांनी केले.

माजलगाव येथील रसिक मंडळाच्या वतीने आयोजित सुगम नाट्यगीत गायन स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसिक मंडळाचे अध्यक्ष ॲड. आर. डी. भिलेगावकर होते. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे कार्यवाह प्रभाकर साळेगावकर, गतवर्षीच्या सुगम नाट्यगीत स्पर्धेतील विजेत्या दुर्वा दिनेश संन्याशी आणि भक्ती विकास जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संगीत महर्षी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रमुख उद्घाटक म्हणून बोलताना माय मराठीचे प्रमुख राजेसाहेब कदम यांनी रसिक मंडळाच्या सांस्कृतिक कार्याचा गौरव केला. रसिक मंडळाने जपलेली संगीत परंपरा आणि या स्पर्धेच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना मिळणारे हक्काचे व्यासपीठ याचे महत्त्व त्यांनी विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाच्या उपाध्यक्ष डॉ निळेकर नरेंद्र यांनी केले, संयोजन श्री सखाराम जोशी , प्रशांत भानप , प्रा. स्नेहल पाठक , प्राणेश पोरे , दिगंबर महाजन यांनी केले. आभार प्रदर्शन ज्येष्ठ सदस्य रंगनाथ सावंत यांनी मानले. यावेळी रसिक मंडळाचे सर्व पदाधिकारी, सभासद व संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमाला

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि १५ ते १७ सप्टेंबर दरम्यान तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प दि.१५ सप्टेंबर रोजी गुंफले जाणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रसिद्ध कवी व विचावंत संदीप जगताप हे बदलते सामाजिक वास्तव आणि अस्वस्थ तरुणाई या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष ड. बी. आर. डक राहणार आहेत. द्वितीय पुष्प दि.१६ सप्टेंबर रोजी प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत डॉ. ललित अधाने गुंफणार असून 'अस्वस्थ तरुणाई पुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सत्यप्रकाश रुद्रवार भूषवणार आहेत तर दि. १७ सप्टेंबर रोजी तृतीय पुष्प प्रसिध्द गीतकार व विचारवंत प्रा. प्रशांत मोरे गुंफणार आहेत . वर्तमान परिप्रेक्ष्यात आजची तरुणाई या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रकाश सोळंके हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत .तर व्याख्यानमालेत माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, डॉ. बळीराम चव्हाण, डॉ. शरद पवार, प्रताप रांजवण, निळकंठराव साबळे, सुरेंद्र रेदासणी, बालासाहेब शिंदे,. आण्णाभाऊ वगरे, डॉ. सुनिल गरड, डॉ. शिवाजीराव मुंडे, शिवाजीराव सुतार, विनायक कदम, भिमराव टाकणखार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. व्याख्यानमालेला उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे , उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, रजिस्ट्रार प्रशांत चव्हाण, प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर प्रा.बापूराव वऱ्हाडे यांनी केले आहे.

# बीड शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या उत्कृष्ट देखाव्याला मिळणार लाखांचे बक्षीस

### देखावा साकारणाऱ्या गणेश मंडळांनी नाव नोंदणी करावी–डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'कल्पतरू प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन भाजपचे नेते डॉ.योगेश क्षीरसागर व 'कल्पतरू'च्या सचिव तथा भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.





गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळे लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी उत्सुक आहेत. गतवर्षी गणरायाचे आगमन होणार आहे. मागील काही वर्षांपासून 'कल्पतरू'च्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन येते. देखाव्यांमध्ये सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक, धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, वैज्ञानिक तसेच स्थानिक ग्रामीण व शहरी जीवनाशी संबंधित सामाजिक संदेश देणारे देखावे साकारणे अपेक्षित आहे. अशा देखाव्यांपैकी उत्कृष्ट मंडळाचा सन्मान करण्यात येतो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'कल्पतरू प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून सार्वजनिक गणेश मंडळांच्या उत्कृष्ट देखाव्यांना लाखो रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**अशी असतील बक्षिसे; उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख बक्षीस दिले जाणार**

पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख, द्वितीय क्रमांकास ७५ हजार, तृतीय क्रमांकास ५१ हजार व सन्मानचिन्ह, तसेच उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख रक्कम बक्षीस स्वरूपात दिली जाणार आहे. दरम्यान, हा बक्षीस वितरण सोहळा गणेशोत्सव कालावधीत आयोजित केला जाईल, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

**अशी आहे निवड समिती**

उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## हलगी बजाव आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे – हनुमान घोडके

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, तसेच अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांचा गत काही वर्षांपासून प्रलंबित असलेला आणि यावर्षीचा पीकविमा तात्काळ अदा करावा, यासह विविध मागण्यांसाठी दि. १६ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने 'हलगी बजाव आंदोलन' करण्यात येणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रगतशील शेतकरी पुत्र हनुमान घोडके यांनी केले.




पाली येथे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आयोजित बैठकीत ते बोलत होते. बीड जिल्ह्यात यंदा पावसाच्या लहरीपणामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक भागात पिकांची उत्पादकता मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दुष्काळी परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

गत काही वर्षांपासून प्रलंबित पीकविमा, यावर्षीच्या नुकसानीचा पीकविमा, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे आणि एकरी ४० हजार रुपयांची मदत या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गावोगावी बैठका घेऊन शेतकऱ्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, हनुमान घोडके, लक्ष्मण नवले, चंद्रसेन नवले, गणेश नवले, बंडू राऊत, अनिल साळुंखे, बाबासाहेब नवले, रामेश्वर नवले, विलास पूर्वे, दशरथ राऊत, शिवाजी नवले, रवींद्र नवले, बळीराम साप्ते, गोविंद राऊत, बजरंग राऊत, लक्ष्मण राऊत, जगन्नाथ राऊत यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### बसस्थानकातुन मंगळसूत्र

बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ४ ग्रॅम वजनाचे मनीमंगळसूत्र लंपास केले होते. याप्रकरणी ठोसर यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी बसस्थानक व शहरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली तसेच गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे वैजिनाथ गुंजाळ याला संशयित म्हणून ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेले ४ ग्रॅम वजनाचे ४८ हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे.

सदर यशस्वी कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि समाधान दौंड, पोलीस हवालदार पांडुरंग दराडे, कल्याण राठोड, पोलीस कॉन्स्टेबल खताळ, ऋषी पोटे व महेंद्र ओव्हाळ यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार दराडे करत आहेत.

### गंभीर दखल व कठोर भूमिका:

आली. नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर असलेल्या शुभम रणधीर वाल्मिकी यांच्यावर या प्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नगरपरिषद परळी वैजनाथचे मुख्याधिकारी यांनी १२ सप्टेंबर २०२६ रोजी आदेश काढून ही कारवाई केली आहे. दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना झालेल्या या प्रकाराची गंभीर दखल घेण्यात आली आहे.संबंधित कर्मचारी कामामध्ये अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आल्याने, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ७९ (१) सह अन्वये तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ४ अन्वये पुढील चौकशी होईपर्यंत १२ सप्टेंबर २०२६ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

याबाबतच्या अनेक तक्रारी नगराध्यक्षांसह पाणीपुरवठा सभापती , न. प. पदाधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. या अनुषंगाने नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ जयश्रीताई रविंद्र गित्ते यांनी संबंधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. या अनुषंगाने मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी संबंधित कर्मचाऱ्याच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत.

### गणपती व महालक्ष्मी सणामुळे

तरीही परंपरा जपण्याचा उत्साह

यंदा परिसरात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शेती व्यवसायावर त्याचा मोठा परिणाम झाला असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. त्यातच जीवनावश्यक वस्तूंसह सणासुदीच्या साहित्याच्या दरातही वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सण साजरा करताना आर्थिक कसरत करावी लागत आहे.

### डॉक्टर जीवनदान देतात, तर

प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य दंत महाविद्यालयाचे डॉ. हिमांशु श्रीवास्तव, डॉ. विकास गर्जे, प्रा. प्रदीप काठोळे व प्रा. बालाजी बाहीरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या युगात चुकीची जीवनशैली आणि व्यायामाच्या अभावामुळे लहान वयातच सांधेदुखी, पाठदुखीचे आजार वाढले आहेत. औषध व शस्त्रक्रियेविना पुन्हा निरोगी बनवण्याचे काम फिजिओथेरपी करते. डॉक्टर जीवनदान देतात, पण फिजिओथेरपिस्ट ते जीवन हालचालींसह आनंदाने जगण्याची ताकद देतात. स्ट्रोक किंवा हृदयविकारानंतर रुग्णाला सामान्य आयुष्यात आणण्यासाठी फिजिओथेरपिस्टचे मार्गदर्शन संजीवनी ठरते असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमास कॅम्पसमधील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. बालाजी बाहीरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रा. रामेश्वर ढोबळे, डॉ. धनश्री टाकसाळे, डॉ. संदेश दळवी, डॉ. श्वेतजा चोपडे, डॉ. रजनी शिंदे यांच्यासह विविध संस्थांचे प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. आभार तृतीया वर्षाची विद्यार्थिनी रक्षंदा मोमीन हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत प्रामाणिकपणा व समर्पणाने उज्ज्वल भवितव्य घडवण्याचे आवाहन केले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी सांगितले की, बदलत्या जीवनशैलीत फिजिओथेरपी ही काळाची गरज बनली असून विद्यार्थ्यांनी संवेदनशीलतेने रुग्णसेवा करावी.

# मुख्याध्यापकांच्या स्वप्नांना माजी विद्यार्थ्यांचे बळ

### मोगरा जिल्हा परिषद शाळेत 'सुपर नाईंटी वन' अभिनव उपक्रमाची सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

भारतासारख्या प्रगतिशील देशात आजही ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधून शिक्षण घेत आहेत,गरीब, कामगार,ऊसतोड मजूर,शेतकरी, शेतमजूर आणि स्थानिक कुटुंबांतील मुलांना ज्ञानाची दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक अविरतपणे करत आहेत.मोगरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष घनघाव सर हे स्वतः याच शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. अनेक वर्षे शिक्षकी पेशात कार्यरत असताना विद्यार्थ्यां विषयीची त्यांची तळमळ कायम राहिली आहे. मोगरा शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आधुनिक व गुणवत्तापूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्याचे त्यांचे स्वप्न आहे. या स्वप्नाला आता शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी बळ देण्याचा संकल्प केला आहे.

याच उद्देशाने शाळेतील सर्वात ज्येष्ठ माजी विद्यार्थी सुधाकर गोसावी यांच्या प्रेरणेतून माजी विद्यार्थी संघाची संकल्पना पुढे आली.आज मोगरा जिल्हा परिषद शाळेचे अनेक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून आपल्या कर्तृत्वाने यशस्वी झाले आहेत.या माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी भरीव योगदान दिल्यास भविष्यात अनेक गुणवंत विद्यार्थी घडविण्यास मोठी मदत होऊ शकते, असा विश्वास गोसावी यांनी व्यक्त केला.मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून माजी विद्यार्थ्यांच्या वतीने प्रथमच 'सुपर नाईंटी वन' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, कौतुक आणि योग्य व्यासपीठ मिळाल्यास ते निश्चितच देशाचे सक्षम व जबाबदार नागरिक बनू शकतात, या विचारातून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.'सुपर नाईंटी वन' अंतर्गत विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचा, शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक जाणीव, आज्ञाधारकपणा, कला आणि विविध क्षेत्रांतील प्रावीण्याचा गौरव करण्यात येणार आहे.या उपक्रमांतर्गत माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने भव्य बक्षिसांची मालिका सुरू करण्यात आली असून हे केवळ पहिले पाऊल आहे.भविष्यात






मोगरा जिल्हा परिषद शाळेला जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक प्रयत्न केले जाणार आहेत.या उपक्रमासाठी गावातील समन्वयक अजय मोरे विशेष प्रयत्न घेत आहेत.याशिवाय विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना व कौशल्यांना प्रोत्साहन देणारी अनेक नाविन्यपूर्ण बक्षिसे भविष्यात देण्यात येणार आहेत.या उपक्रमासाठी पांढरपोटे हनुमंत सर,सोनवळे सर, गायके मॅडम, शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी तसेच माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभत आहे.

माजी विद्यार्थ्यांना योगदानाचे आवाहन

आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेतील सध्याच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येक माजी विद्यार्थ्याने आपल्या क्षमतेनुसार योगदान द्यावे. आर्थिक मदत, शैक्षणिक साहित्य, मार्गदर्शन किंवा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही स्वरूपातील सहकार्याचे स्वागत आहे, असे आवाहन प्रा. सुधाकर गोसावी सर जेष्ठ पत्रकार उमेश काका मोगरेकर पत्रकार पांढरपोटे ज्योतीराम गिण्यानदेव राठोड सरपंच मोगर संदिप सावंत (उपसरपंच मोगरा ) बबन पवार उद्धव धुमाळ अप्पा प्रकाश खिस्ते काका रंणजीत घनघाव ( विस्तार अधिकारी ) मच्छिंद्र इंगळे , सिराज काझी आशोक काळे सर बाबा शिंदे 'कृष्णा शिंदे शाहु घनघाव,कैलास मानधने (पोलीस पाटील मोगरा ) विकास झेटे ' भारत घनघाव , पौळ राजरत्न आणि अमोल कुलकर्णी एल आय सी चे अधिकारी संभाजीनगर यांनी केले.विद्यार्थी उपक्रमास लक्ष्मीकांत जोशी बि.थे देशमुख , यादव घनघाव शाहीर अंजराम घनघाव यांनी शुभेच्छा दिल्या.

विविध क्षेत्रांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

विद्यार्थ्यांच्या विशेष कलागुणांचा विचार करून विविध स्मृतिप्रीत्यर्थ पुढील पुरस्कार देण्यात येणार आहेत.

– कै. अरुण जोशी यांच्या स्मरणार्थ मानवता, समाजसेवा आणि सामाजिक जाणीव अंगी असलेल्या विद्यार्थ्यास 'समाजसेवक गुणवंत विद्यार्थी' पुरस्कार देण्यात येणार आहे.

– कै. रामचंद्र मोगरेकर यांच्या स्मरणार्थ पेंटिंग व चित्रकला क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांचा बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे.– कै. जानकीराम पंत देशमुख व कै. मालनबाई देशमुख यांच्या स्मरणार्थ आज्ञाधारक व शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.

– मोगरा परिसरातील विविध तांड्यांमध्ये ज्ञानदान करणारे आदर्श शिक्षक कै. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या स्मरणार्थ मराठी विषयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

– ज्येष्ठ विधिज्ञ कै. अनिलराव मोरेकर यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यास 'बेस्ट अकॅडमिक' पुरस्कार देण्यात येणार आहे.– गजानन भास्करराव गोसावी यांच्या वतीने शिष्यवृत्तीधारक तसेच नवोदय परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# माजलगाव धरणाच्या उंचीवाढीविरोधात युवा शेतकरी कृती समिती आक्रमक

### आंदोलनास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा जाहीर पाठिंबा – नानासाहेब घोडके



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरणाच्या प्रस्तावित उंचीवाढीच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी युवा शेतकरी कृती समितीच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनाला आता विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत आहे. धरणाची उंची वाढविण्याऐवजी उपलब्ध जलसाठ्याचा योग्य पद्धतीने वापर करून शेतकऱ्यांच्या हिताचे पर्याय राबवावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या आंदोलनाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला असून, महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसोबत ठामपणे उभे राहण्याची भूमिका व्यक्त केली आहे. माजलगाव धरणाच्या उंचीवाढीमुळे पुनर्वसित गावांतील शेतकऱ्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे निर्णय घेण्यापूर्वी संबंधित शेतकरी व ग्रामस्थांची बाजू शासनाने गांभीर्याने ऐकून घ्यावी, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

धरणाची उंची वाढविण्याऐवजी माजलगाव धरणातील गाळ काढून जलसाठवण क्षमता वाढविणे तसेच साळींबा उपसा सिंचन योजनेला गती देणे, हा शेतकऱ्यांच्या हिताचा पर्याय असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या मागण्यांसाठी सुरू असलेल्या लढ्याला सामाजिक संघटनांनीही पाठिंबा दिल्याने आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. विकासाच्या नावाखाली पुनर्वसित शेतकऱ्यांवर अन्याय होता कामा नये, अशी भूमिका नानासाहेब घोडके यांनी व्यक्त केली.

माजलगाव धरणाच्या उंचीवाढीचा विषय सध्या परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत संवेदनशील बनला असून, शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी नानासाहेब घोडके यांनी या वेळी बोलून दाखवली.




# केळीवर सिगाटोकाचा घाला! आखाती देशांची निर्यात ठप्प; ८० टक्के माल बाधित

नांदेड / प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्याची ओळख आणि हजारो शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख आधार असलेली अर्धापुरी केळी सध्या अभूतपूर्व संकटातून जात आहे. हवामानातील सातत्याने होणारे बदल, अतिवृष्टी, त्यानंतरचा प्रदीर्घ हिवाळा आणि चालू वर्षातील तीव्र उन्हाळा अशा प्रतिकूल परिस्थितीचा केळीच्या बागांवर विपरीत परिणाम झाला आहे.

या बदलत्या हवामानामुळे केळीच्या बागांमध्ये सिगाटोका या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे चित्र आहे. रोगामुळे पाने करपणे, झाडांची वाढ खुंटणे आणि घडाची वाढ पूर्ण होण्यापूर्वीच तो झाडावर पिकण्यास सुरुवात होणे, अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे केळीचा दर्जा घसरला असून आंतरराष्ट्रीय बाजारासाठी आवश्यक असलेली प्रतवारी मिळत नसल्याने आखाती देशांमध्ये जाणारी कोट्यवधी रुपयांची केळीची निर्यात ठप्प झाल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, भोकर आणि उमरी हे तालुके केळी उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. या भागाला केळीचे आगार म्हणून ओळखले जाते. मात्र, गतवर्षी झालेली अतिवृष्टी, त्यानंतरचा प्रदीर्घ हिवाळा आणि चालू वर्षातील तीव्र उन्हाळा यामुळे केळीच्या झाडांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती कमी झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. हवेत असलेला दमटपणा आणि तापमानातील सातत्याने होणारे बदल यामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रसार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले. परिणामी अनेक बागांमध्ये सिगाटोकाचा प्रादुर्भाव वाढला.

झाडे करपली, घड पूर्ण वाढण्यापूर्वीच पिकू लागले :

सिगाटोकाच्या प्रादुर्भावामुळे केळीची पाने आणि झाडे करपण्यास सुरुवात झाली आहे. त्याचा थेट



परिणाम घडाच्या वाढीवर झाला आहे. काही ठिकाणी घड पूर्ण वाढ होण्यापूर्वीच झाडावर पिकू लागल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित दर्जाचा माल मिळत नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी केळीची गुणवत्ता, आकार आणि प्रतवारी महत्त्वाची असते. रोगामुळे या निकषांवर माल कमी पडत असल्याने निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे.

आखाती देशांची निर्यात ठप्प : नांदेड जिल्ह्यातून दरवर्षी हजारो टन उच्च दर्जाची केळी आखाती देशांमध्ये पाठवली जातात. या निर्यातीतून शेतकरी, व्यापारी, वाहतूकदार आणि इतर संबंधित घटकांना मोठी आर्थिक उलाढाल मिळते. मात्र, यंदा सिगाटोकाच्या प्रादुर्भावामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचा माल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत नसल्याचे व्यापारी सांगतात. त्यामुळे आखाती देशांकडे होणारी केळीची निर्यात ठप्प झाली आहे. सध्या स्थानिक बाजारपेठेत चांगल्या दर्जाच्या केळीला प्रतवारीनुसार १ हजार ते ११०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळत आहे. मात्र, ज्या बागांमध्ये सिगाटोकाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आहे, त्या भागातील माल खरेदी करण्यास व्यापारीही तयार नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर रोगग्रस्त घडांची विल्हेवाट लावण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

महामार्गावर नैसर्गिक पिकलेली म्हणून विक्री? या संकटाचा आणखी एक धक्कादायक पैलू समोर आला आहे. व्यापाऱ्यांनी नाकारलेला किंवा सिगाटोकामुळे मुदतीपूर्वी झाडावर पिकलेला माल काही जण झाडावरच नैसर्गिकरीत्या पिकलेली केळी असल्याचे सांगून विकत असल्याचा आरोप आहे. भोकर, मुदखेड आणि अर्धापूर मार्गावर केळीच्या बागांलगत तात्पुरती विक्री केंद्रे उभारली जात असल्याचे सांगितले जात आहे. या ठिकाणी विकला जाणारा माल प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा नसून, काही मध्यस्थ बाधित किंवा व्यापाऱ्यांनी नाकारलेला माल अत्यंत कमी दरात मिळवून रस्त्यालगत विकत असल्याचे सांगितले जाते.

ग्राहकांनी काय काळजी घ्यावी? झाडावर पिकलेली म्हणून विक्री होत आहे म्हणून केळीची गुणवत्ता आपोआप चांगली असेलच असे नाही. ग्राहकांनी केळी खरेदी करताना फळाचा बाह्य दर्जा, कुजलेले किंवा काळवंडलेले भाग, असामान्य डाग आणि फळाची एकूण स्थिती तपासावी. रस्त्यालगत विक्री होणाऱ्या मालाबाबत विक्रेत्याकडून त्याच्या स्रोताची माहिती घेणेही महत्त्वाचे आहे.


८० टक्के उत्पादकांचे नुकसान? यंदा सिगाटोकाचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झाला असून बाजारात जाणाऱ्या मालापैकी केवळ सुमारे २० टक्के माल चांगल्या दर्जाचा असल्याचे सांगितले जाते. परिणामी सुमारे ८० टक्के उत्पादकांचे नुकसान होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.- निलेश देशमुख, केळी व्यापारी युद्धजन्य परिस्थिती आणि रोगाचा एकत्रित परिणाम मागील वर्षीही केळी व्यवसायावर झाला होता. त्यात यंदाच्या रोगप्रादुर्भावाची भर पडल्याने केळी उत्पादकांचे आर्थिक गणित आणखी बिघडले आहे. सिगाटोकाच्या प्रादुर्भावामुळे यंदा आंतरराष्ट्रीय दर्जाचा माल मोठ्या प्रमाणावर तयार झालेला नाही. त्यामुळे आखाती देशांची निर्यात थांबली आहे. सध्या दिल्ली, पंजाब आणि हरियाणा या बाजारपेठेतच माल जात आहे. त्यातही केवळ सुमारे २० टक्के माल चांगल्या दर्जाचा आहे.- निलेश देशमुख, केळी व्यापारी, नांदेड

शेतकऱ्यांना शासकीय मदतीची गरज : केळी हे बहुवार्षिक आणि खर्चिक पीक असल्याने रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. रोगग्रस्त बागेत उत्पादन घटण्यासोबतच दर्जेदार माल तयार होत नसल्याने बाजारभावही कमी मिळतो. त्यामुळे सिगाटोकाचा प्रादुर्भाव, बाधित क्षेत्र आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याचे शास्त्रीय पद्धतीने सर्वेक्षण करून आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन आणि शासकीय मदत उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## हरभऱ्याचे काबुली वाण व त्यांची वैशिष्ट्ये

हरभरा हे रब्बी हंगामातील कमी पाण्यावर येणारे कडधान्य पीक आहे. मानवी आहारात या पिकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हरभऱ्याच्या काबुली वाणास बाजारात चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी काबुली हरभऱ्याची लागवड करतात. हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत करता येते.

काबुली वाण : विराट - हा वाण ११० ते ११५ दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये सरासरी ११ क्विंटल प्रति हेक्टर तर बागायती क्षेत्रामध्ये सरासरी १९ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. अधिक टपोरे दाणे व मर रोगास प्रतिकारक्षम वाण आहे. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम मिळते. कृपा - या वाणाचा कालावधी १०५ ते ११० आहे. मर रोगास प्रतिकारक्षम असून सफेद पांढरे दाणे आहेत. बागायतीमध्ये १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. या वाणापासून जास्त टपोरे दाणे मिळतात. पीकेव्हीके-२ - हा वाण १००-१०५ दिवसात काढणीस येतो. मर रोगास प्रतिकारक्षम असून अधिक टपोरे दाणे मिळतात. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ४० ग्रॅम मिळते. बागायती क्षेत्रात या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. पीकेव्ही- ४ - हा वाण मररोगास प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून अधिक टपोरे दाणे मिळतात. हा वाण १०० ते ११० दिवसांत तयार होतो. प्रतिहेक्टरी सरासरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळते.



बीडीएनजीके-७९८ - उभट पसरणारा हा वाण असून मध्यम आकाराचे दाणे असतात. हा वाण मररोग व खुजारोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी ११० ते ११५ दिवस आहे. या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

## गाजर लागवड : कमी खर्चात आणि कमी कालावधीत बंपर उत्पन्न!

गाजर लागवड हा कमी खर्चात आणि कमी कालावधीत चांगलं उत्पन्न मिळवून देणारा एक उत्तम व्यवसाय आहे. गाजराला बाजारात बाराही महिने मागणी असते. गाजराची यशस्वी आणि फायदेशीर लागवड करण्यासाठी आपण महत्वाचे मुद्दे पाहणार आहोत.

हवामान आणि जमीन : गाजर हे प्रामुख्याने थंड हवामानातील पीक आहे. १५ ते २० तापमान गाजराच्या चांगल्या वाढीसाठी आणि गडद रंगासाठी उत्तम मानले जाते. गाजराच्या लागवडीसाठी भ भुशीत, सुपीक आणि उत्तम निचरा होणारी काळसर-लोम (मळणीची) जमीन आवश्यक असते. कडक किंवा खडकाळ जमिनीत गाजराचा आकार वाकडा होतो आणि वाढ खुंटते.

लागवडीचा हंगाम : रब्बी हंगाम (सर्वोत्तम): ऑक्टोबर ते नोव्हेंबर (या काळात येणाऱ्या गाजराची चव आणि रंग उत्तम असतो). उन्हाळी हंगाम : फेब्रुवारी ते मार्च (डोंगराळ किंवा थंड हवेच्या भागात).

सुधारित जाती : आशियाई जाती (स्थानिक): पुसा केशर (गडद लाल), पुसा मेघाली, चंतनी (नारंगी). परदेशी जाती (युरोपीय): नँटीज (), इम्पेरेटर (या जाती प्रामुख्याने थंड हवामानात येतात).

लागवड पद्धत : पूर्वमशागत:





जमीन २-३ वेळा उभी-आडवी नांगरून भुसभुशीत करून घ्यावी आणि हेक्टरी १५-२० टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. पेरणी: गाजराची लागवड सपाट वाफ्यात किंवा सरी-वरंब्यावर केली जाते. सरी-वरंब्यावर लागवड केल्यास गाजराची लांबी चांगली वाढते. बियांचे प्रमाण: एक हेक्टरसाठी अंदाजे ५ ते ६ किलो बियाणे लागते. बियाणे अतिशय बारीक असल्याने त्यात बारीक वाळू किंवा माती मिसळून पेरणी करावी. दोन ओळीत ३० सेमी आणि दोन रोपांत १० सेमी अंतर ठेवावे.

खत आणि पाणी व्यवस्थापन : पाणी: पेरणी केल्याबरोबर लगेच हलके पाणी द्यावे. गाजराची पूर्ण वाढ होईपर्यंत जमिनीच्या मगदुरासार ७ ते १० दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. पाण्याचा ताण पडल्यास गाजराला तडे जातात. खत: पेरणीच्या वेळी नत्र, स्फुरद आणि पालाशची शिफारशीत मात्रा द्यावी. लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी उरलेला नत्राचा हप्ता द्यावा.

आंतरमशागत आणि काढणी : विरळणी आणि खुरपणी: बियाणे उगवून आल्यावर १५-२० दिवसांनी विरळणी करावी (दाट झालेली रोपे काढावीत). पीक तणमुक्त ठेवणे गरजेचे आहे. काढणी: जातीनुसार ८० ते १०० दिवसांत गाजर काढणीस तयार होते. काढणीपूर्वी वाफ्याला हलके पाणी द्यावे, जेणेकरून गाजरे उपटणे सोपे होते आणि ती तुटत नाहीत. उत्पादन: योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति हेक्टरी २५ ते ३० टन उत्पादन सहज मिळू शकते.

## जनावरांना पशुखाद्य देताना अशी घ्या काळजी

पशुपालनामध्ये पशुखाद्य हा महत्त्वाचा घटक मानला जातो. दिवसेंदिवस पशुखाद्याच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. खासकरून दुभत्या जनावरांना दूध वाढण्यासाठी, तसेच शरीराची झीज भरून काढण्यासाठी पशुखाद्य दिले जाते. पशुपालनामध्ये चाऱ्याव्यतिरिक्त पशुखाद्यासाठी पशुपालकांना बराच खर्च येतो. पशुखाद्यातील घटक : पशुखाद्यामध्ये पचनीय पदार्थांचे प्रमाण हे ७५ ते ८० टक्के असते, तसेच प्रथिने, कर्बोदके तसेच पिष्टमय पदार्थ जास्त असतात. जर पशुखाद्य भिजवले तर त्यामध्ये बुरशी वाढण्याची व बुरशीजन्य विष तयार होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक तज्ज्ञ पशुखाद्य भिजवून देऊ नये असे सांगतात. परंतु पारंपरिक पद्धतीमध्ये अनेक शेतकरी आंबवण करून देतात. पशुखाद्य आंबवण करुन दिल्याने होणारे दुष्परिणाम : जनावरांना दिला जाणारा भरडा हा रात्रभर भिजू घातल्याने त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर यीस्ट म्हणजेच एकपेशीय बुरशीची वाढ होते. त्यामुळे असे पशुखाद्य जनावरांना दिल्यास बुरशीजन्य विषबाधा होऊ शकते. जास्त वेळ भिजत घातलेले पशुखाद्याचे भांडे किंवा हौद चांगल्या प्रकारे स्वच्छ न केल्यास त्या भांड्यामध्ये बुरशी वाढते. सरकीमध्ये अनेकदा लोखंडाचे तुकडे आढळतात. त्यामुळे सरकी भिजवल्यास त्यात लोखंडाचे तुकडे असल्यास आपल्या हाताला आढळतात. त्यामुळे



बरेचसे पशुपालक जनावरांना अशा प्रकारे सरकी भिजवून देण्यास प्राधान्य देतात. पीठ किंवा भरडा या स्वरूपातील पशुखाद्य जनावरांना कोरड्या स्वरूपात दिल्यास जनावरांना ठसका लागण्याची शक्यता असते, म्हणून बरेच पशुपालक हा भरडा जनावरांना भिजवून देतात. भिजवल्यामुळे भरड्याचे आकारमान वाढते त्यामुळे जनावरांच्या पोटाचा आकार वाढतो. त्यामुळे जनावरांची चारा खाण्याची क्षमता कमी होते. तसेच अशा पशुखाद्यात पाणी जास्त टाकल्यास जनावरांच्या पोटात पाण्याचे प्रमाण जास्त होऊन चारा खाण्याचे प्रमाण कमी होते व दुग्धउत्पादन कमी होते. भिजवलेल्या पशुखाद्यात बाहेरच किण्वण प्रक्रिया झाल्याने असे पशुखाद्य जनावरांनी खाल्ल्यास पोटामधील आम्लता वाढते. अशी आम्लता वाढत राहिल्याने दुभत्या जनावरांना खुराचे तसेच कासेचे आजार होतात. जनावरांना पशुखाद्य जास्त भिजवून तसेच त्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्यास असे पशुखाद्य जनावरांनी खाल्ल्यास पोटातील उष्णता कमी होते. तसेच पोटातील जिवाणू अचानक थंड पाणी आल्याने मृत पावतात. पोटातील सूक्ष्मजीव कमी झाल्याने अपचनाचा धोका निर्माण होतो.

पशुखाद्य कसे द्यावे? जनावरांना सरकी भिजवून घालायची असेल तर रात्रभर न घालता फक्त दोन ते अडीच तासच भिजवून खायला घालावी. सरकीमध्ये लोखंडाचे तुकडे असण्याची शक्यता असते, त्यामुळे हाताने किंवा लोहचुंबकाच्या साह्याने लोखंडाचे तुकडे काढून नंतरच जनावरांना ते पशुखाद्य द्यावे. सरकी भिजवताना स्वच्छ धुतलेले भांडे वापरावे. पीठ किंवा भरडा दिल्याने जनावरांना ठसका लागण्याची शक्यता वाटत असल्यास असे पीठ किंवा भरड्यामध्ये थोडेसे पाणी शिंपडून जनावरांना द्यावे. त्यामध्ये पूर्ण पातळ किंवा भिजवण्यापेक्षा फक्त ठसका लागणार नाही, अशा पद्धतीने ओलसर करून जनावरांना द्यावे. बाजारात मिळणारे पशुखाद्य गोळी पेंड किंवा कांडी पेंड ही जनावरांना भिजवून देण्याची गरज नाही. कारण गोळी पेंड किंवा कांडी पेंड खाताना जनावरांना ठसका लागत नाही. पशुखाद्याचे भांडे किंवा हौद स्वच्छ धुवून वापरावे.




### जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊर्दू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्टपैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ अ‍ॅग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्‍या व अधिक उत्पादन देणार्‍या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# आगारातील एसटी बसेस गणेशोत्सवासाठी कोकणात;आगाराचा कारभार वाऱ्यावर?

पाथर्डी। प्रतिनिधी

कोकण वासियांचा गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी राज्याच्या बहुतेक भागातून परिवहन महामंडळाने मन मानेल त्या पद्धतीने बसेस नेल्याने स्थानिक पातळीवर अवैध प्रवासी वाहतूकदारांकडून प्रवाशांची अडवणूक होत असून शाळकरी मुलांच्या शाळेचा प्रश्न सुद्धा गंभीर बनला आहे गेल्या दोन दिवसांपासून पाथर्डी आजाराच्या एकूण ३३ बसेस कोकण विभागाच्या गणेशोत्सवासाठी पाठविण्यात आल्या. स्थानिक पातळीवर ऐन सणासुदीच्या दिवसात एसटी आगाराचे काम ठप्प झाल्याने तासंतास प्रवाशांना बसची वाट पाहत स्थानकावर बसावे लागते. दरवर्षी ऐन गणेशोत्सवाच्या काळात आठवडाभर एसटीचे वाहतूक नियोजन कोकणातील गणेशोत्सवामुळे पूर्णपणे बिघडते पाथर्डी आगा रामध्ये एकूण ५७



बसेस आहेत यातील अनेक जुन्या बसेस पुणे नाशिक अशा मार्गावर पाठविल्या जातात मुळात सर्व प्रमुख मार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार बसेस सोडण्यासाठी आणखी किमान दहा बस गाड्यांची तातडीची गरज असताना ऐन सणासुदीच्या दिवसात एसटीने मक्तेदारी पद्धतीने प्रवाशांची अडवणूक चालू आहे

कोकण विभागात गणेश भक्त राहतात उर्वरित महाराष्ट्रात गणेशोत्सव नसतो अशी भ्रामक कल्पना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डोक्यातून अनेक वर्षांपासून जायला तयार नाही एसटी सेवेचे नियम धाब्यावर बसवत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बसेस पाठविण्याचे प्रमाण फर्मान निघते गौरी गणपती साठी सर्वच गावातून प्रवाशांची प्रवासाची लगबग वाढते ग्रामीण भागात बस सेवेचे पूर्णपणे नियोजन कोलमडले असून काही मार्गांवर अवैध प्रवासी वाहतूकदारांकडून प्रवाशांची लूट सुरू आहे. विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यासाठी जीव धोक्यात घालून ट्रॅक्टर टेम्पो अशा वाहनांमधून पालकांना पर्यायी व्यवस्था करावी लागते नगर पाथर्डी नगर या मार्गावर गेल्या काही दिवसात सुरळीत सुरू असलेली बस सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे पुणे मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांचे तर मोठे हाल असून खाजगी ट्रॅव्हलच्या बहुतेक वाहतूकदारांनी दरवाढ केली आहे अजून किमान चार दिवस आगाराचे वाहतुकीचे काम सुरळीत होऊ शकणार नाही. महामंडळाने गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सेवेसाठी खाजगी बसेस कराराने उपलब्ध करून प्रवाशांची वाहतूक करावी अशी प्रवाशांची मागणी आहे अवैध वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांच्या एजंटांनी बस स्थानकांमध्ये गाड्या लावून प्रवासी वाहतूक सुरू केली याबाबत माहिती देताना प्रवासी संघटनेचे संतोष जिरेसाळ म्हणाले राज्य परिवहन महामंडळाला फक्त कोकणामधील गणेश भक्तांकडून उत्पन्न मिळत असेल तर उर्वरित महाराष्ट्रातील भाविकांसाठी वेगळी सुविधा करावी कायद्यानुसार प्रवासी वाहतूक करण्याचा करार प्रवाशांबरोबर अमलात असल्याने अडवणूक करण्याबद्दल महामंडळा विरुद्ध न्यायालयात दाद मागणे शिवाय पर्याय नाही दोन्ही बस स्थानकांवर तासन्तास अनेक प्रवासी विशेषतः महिला मुली गावाकडे जाणाऱ्या गाड्यांची वाट बघतात छेडछाडीचे प्रकार नियंत्रणात ठेवणे उपस्थित कर्मचाऱ्यांच्या आवाक्या बाहेर असते गुंडांकडून कर्मचाऱ्यांनाही धमकावली जाते लहान मुलांना अशा गर्दीचा मोठा त्रास होतो सरकारकडून अडवणुकीबाबत फारशी गांभीर्याने दखल घेतली जात नाही राजकीय नेते अधिकारी पदाधिकारी व सधन व्यक्ती खाजगी वाहनातून फिरत असल्याने त्यांना सर्वसामान्य माणसाची अडचण अडवणूक समजायला उशीर लागेल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने पर्यायी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी वाहतूक प्रवासाकडून होत आहे.

## रावसाहेब दानवे यांचे स्वीय सहाय्यक गोवर्धन कोल्हेंना शिवीगाळ व धमकी

जालना । प्रतिनिधी

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे स्वीय सहाय्यक गोवर्धन कोल्हे यांना अज्ञात व्यक्तीने मोबाईलवरून अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध जालना पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कोल्हे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कार्यालयातून शिवशक्ती ग्रीन सिटीमध्ये घरी गेल्यानंतर दुपारी सुमारे ४.३१ वाजता एका मोबाईल क्रमांकावरून वारंवार फोन येऊ लागले. सुरुवातीला संबंधित व्यक्तीने फोन करण्यास सांगितले. त्यानंतर कोल्हे यांनी फोन केला असता, समोरील व्यक्तीने तो रॉंग नंबर असल्याचे सांगून फोन कट केला.

त्यानंतर त्याच व्यक्तीने पुन्हा तीन ते चार वेळा फोन करून, ''तुम्हाला कोण पाहिजे? तुम्ही कोण बोलता? तुमचे नाव सांगा आणि कुठून बोलता?'' अशा प्रकारे विचारणा केली. तसेच शिवीगाळ व धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले अराहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी तक्रार दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.असा उलट प्रश्न केला. मी त्याला माझे नाव सांगताच त्याने माझ्याशी अत्यंत उद्धटपणे व अश्लील भाषेत बोलून माझ्या कानाखाली मारण्याची तसेच माझ्या घरी येण्याची धमकी दिली. माझ्या आई-बहिणीबद्दल अत्यंत अश्लील शिवीगाळ केली.

संबंधित व्यक्तीने घरी येण्याची धमकी दिल्यामुळे माझ्या मनात कुटुंबीयांच्या सुरक्षिततेबाबत भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सदर मोबाईल क्रमांक ७२४९८७६४०१ धारक व्यक्तीचा तातडीने शोध घेऊन त्याची ओळख निश्चित करावी. तसेच त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी श्री. कोल्हे यांनी केली असून, याप्रकरणी कदिम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ढोकी रोपवाटिकेची ४१ एकर जमीन अतिक्रमणमुक्त

### नागरिकांच्या साखळी उपोषण अन् ढोकी बंद आंदोलनाला यश

ढोकी। प्रतिनिधी

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील जिल्हा फळरोपवाटिकेच्या गट क्रमांक ३४ व ३५ मधील सुमारे ४१ एकर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण अखेर प्रशासनाने शनिवार (दि. १२) रोजी धडक कारवाई करून हटवले. अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी गाव बंद, लाक्षणिक व साखळी उपोषणाच्या माध्यमातून तीव्र आंदोलन उभारले होते. रोपवाटीकेच्या जागेत आदिवासी, पारधी समाजातील नागरिकांच्या राहुट्या होत्या. अतिक्रमण काढले असले तरी पर्यायी जागेचा प्रश्न निरुत्तर आहे.

ढोकी गावालगत महामार्गाच्या परिसरात कृषी विभागाची जिल्हा फळरोपवाटिका असून तेथे कोट्यवधी रुपये किमतीची ४१ एकर शासकीय जमीन आहे. ही जागा अतिक्रमणमुक्त करून संबंधितांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नागरिकांनी केली होती. या कारवाईत उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार, नायब तहसीलदार महादेव शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे यांच्यासह १२ अधिकारी, ९० पोलिस कर्मचारी, दोन जलद प्रतिसाद पथकाच्या तुकड्या आणि कृषी विभागाचे ४० कर्मचारी सहभागी झाले होते. कृषी विभागाकडून प्रवीण चोपडे, शीतल लिमकर तर महसूल विभागाकडून संभाजी तोगरे, व्यंकटेश लोमटे, हरीश जाधव, प्रसाद मिसाळ यांनी सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस, महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने दुपारी १२ वाजता कारवाईस सुरुवात केली. जेसीबी व ट्रॅक्टरच्या साहाय्याने ५ तास कारवाई करून जमीन मोकळी करण्यात आली. आंदोलनादरम्यान खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील आणि संजय निंबाळकर यांनी उपोषणस्थळी भेट दिली होती. तसेच पालकमंत्री प्रतापराव सरनाईक व आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्हिडिओ कॉलद्वारे उपोषणकर्त्यांशी संवाद साधून मागण्या जाणून घेत प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. जानेवारी २०२५ मध्ये याच जागेवरील अतिक्रमण प्रशासनाने हटविले होते, मात्र ते पुन्हा झाल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले होते. या फळरोपवाटिकेत शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात फळ, फुलांची व कलमी रोपे मिळत होती.

## जिल्ह्यामध्ये सरी बरसल्या; संकटाचे ढग मात्र कायम

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात तब्बल ४२ दिवसांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर शनिवारी मान्सूनने अखेरच्या टप्प्यात हजेरी लावली. या पावसामुळे १ लाख २७ हजार हेक्टरवरील मका व चारा पिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी सोयाबीन, कापूस आणि डाळवर्गीय पिकांचे झालेले नुकसान कायम राहणार आहे. जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळांत ३१ ते ४० दिवस, तर ५१ मंडळांत २१ ते ३० दिवस पावसाचा खंड राहिल्याने १०८ मंडळांतील पिके अक्षरशः होरपळली आहेत.

१२ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात संपूर्ण हंगामात सरासरीच्या केवळ ५७.४ टक्के म्हणजे २५७.३ मिमी पाऊस झाला आहे. सप्टेंबरमध्ये तर सरासरीच्या अवघा ३.३ मिमी पाऊस झाला असून, त्याचे प्रमाण केवळ ५.६ टक्के आहे. पारनेरमध्ये १.६, शेवगाव १.७, श्रीरामपूर १.८, कर्जत १.९ आणि राहुरीत ३ टक्के पाऊस झाला आहे. सप्टेंबरच्या १२ दिवसांत जिल्ह्यातील १२ तालुक्यांत पावसाने एक आकडी टक्काही ओलांडलेला नाही. राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव आणि नेवासा पट्ट्यात खरीप पिकांची अवस्था चिंताजनक आहे. राहुरीत जून ते सप्टेंबरच्या सरासरी ४३१.८ मिमीच्या तुलनेत अवघा १११.८ मिमी म्हणजे २५.९ टक्के पाऊस झाला आहे. दुसरीकडे अकोलेत जूनपासून ५७२.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात पावसाचे मोठे विषम चित्र दिसत आहे. पिकांच्या निर्मितीचा अंतिम टप्पा जुलै-ऑगस्टमधील पावसानंतर सप्टेंबरमध्ये सोयाबीनमध्ये दाणे भरणे, तर कापसात बोंडे भरण्याची प्रक्रिया सुरू होते. मात्र ऑगस्ट कोरडा गेल्याने पिकांची वाढ खुंटली. आता अंतिम टप्प्यातच पिके करपू लागल्याने खरीप हंगामाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

## कोरेगाववाडीत ग्रामस्थांचे तिसऱ्या दिवशीही उपोषण

### ग्रामसभा न झाल्याने १० सप्टेंबरपासून आंदोलन; भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची मागणी

उमरगा। प्रतिनिधी

तालुक्यातील कोरेगाववाडी ग्रामपंचायतीची २५ ऑगस्ट रोजीची नियोजित ग्रामसभा न झाल्याने तातडीने चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी आणि २० ऑगस्टला पंचायत समिती कार्यालयाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी न झाल्याबाबत कारवाई करावी, या मागणीचे निवेदन कोरेगाववाडी ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी विनोद जाधव यांना दिले होते. मात्र, प्रशासनाकडून सतत उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याने अर्जदार व ग्रामस्थांनी गुरुवारी (दि. १०) पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. शनिवारी (दि. १२) तिसऱ्या दिवशीही हे उपोषण सुरूच होते.

कोरेगाववाडी ग्रामस्थांना ग्रामपंचायत विकासकामांचा, निधीचा, खर्चाचा, विविध योजनांचा व ग्रामपंचायतीच्या कारभाराचा हिशोब घ्यायचा होता. मात्र, २५ ऑगस्टची नियोजित ग्रामसभा घेण्यात आली नाही.



पंचायत समिती कार्यालयाने २० ऑगस्ट रोजी पत्र काढून, ग्रामसेवक अनुपस्थित असल्यास गावात शिक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका किंवा अन्य शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांची सचिव म्हणून नियुक्ती करून ग्रामसभेची कार्यवाही व इतिवृत्त पूर्ण करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार सचिवाच्या अनुपस्थितीत अशा पर्यायी कर्मचाऱ्यामार्फत कार्यवाही करण्याची तरतूद असल्याने, ''ग्रामसेवक उपस्थित नव्हते'' हे कारण ग्राह्य धरता येणार नाही, असा मुद्दा ग्रामस्थांनी मांडला आहे. तसेच २० ऑगस्टचा आदेश ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर तत्काळ प्रसिद्ध करणे अपेक्षित असताना, २० ते २४ ऑगस्टदरम्यान माहिती न देता अगदी आदल्या दिवशी म्हणजेच २४ ऑगस्टला देण्यात आली. ही कार्यपद्धती नागरिकांच्या अधिकारावर गदा आणणारी असून प्रशासनावरील विश्वास उडवणारी आहे. ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट व भोंगळ कारभाराबाबत गेल्या २ वर्षांत वारंवार विचारणा करूनही कोणतीही माहिती न मिळाल्याने अखेर ग्रामस्थांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट व भोंगळ कारभाराबाबत वेळोवेळी चौकशी केली असता कोणतीही माहिती मिळाली नाही. पंचायत समितीकडे गेल्या दोन वर्षांपासून वारंवार विचारणा केली असता प्रशासनाने सतत उडवाउडवीची उत्तरे दिली. यामुळे त्रस्त होऊन अर्जदार व ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा मार्ग निवडला आहे.

## खुलताबाद, फुलंब्री तालुक्यात ३० दिवसांनी पाऊस

### पैठण, वेरूळ, ढोरकीन, घाटनांद्रा, करमाड, शिऊर, सिल्लोड परिसरात रिमझिम हजेरी

खुलताबाद। प्रतिनिधी

खुलताबाद, वेरूळ, फुलंब्री, सोयगावमध्ये मागील ३० दिवसांपासून पावसाने उघडीप दिली होती. पाण्याअभावी खरिपातील पिके वाळून चालल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र, शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास पावसाने या भागात एक तास हजेरी लावल्याने पिकांना जीवदान मिळाले आहे. दरम्यान, पैठण, कातपूर, करमाड, शिऊर, ढोरकीन, घाटनांद्रा, वेरूळ परिसरातही रिमझिम पाऊस झाला आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे शेतातील खरीप पिके अक्षरशः माना टाकू लागली होती. ऐन हंगामात हातातोंडाशी आलेली पिके पूर्णपणे वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी रोज आभाळाकडे डोळे लावून बसले होते.

या पावसामुळे सोयाबीन, कपाशी, मका, तूर, मूग, उडीद, बाजरी, ज्वारी आणि भाजीपाल्याला मोठा आधार मिळाला आहे. फुलंब्री तालुक्यात गेल्या ३० दिवसांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर शनिवारी पावसाने अखेर रिमझिम



हजेरी लावली. या पावसामुळे सिंचनाची सोय असलेल्या बागायती क्षेत्रातील पिकांना तात्पुरते जीवनदान मिळाले असले, तरी कोरडवाहू क्षेत्रातील पिके प्रदीर्घ खंडामुळे पूर्णपणे वाया गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. पाऊस कमी असल्याने नदी-नाल्यांना पूर आला नाही. पावसाळा संपत आला तरी मोठा पाऊस न झाल्याने तालुक्यात ३ ते ४ दिवसांआड पाणीपुरवठा होत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात पुढील दोन दिवस हवामान ढगाळ राहणार असून पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १२ आणि १३ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. या काळात पाऊस होण्याचा अंदाज सुमारे ७५ टक्के व्यक्त करण्यात आला आहे. १४ सप्टेंबरपासून पावसाचा जोर ओसरणार आहे. शनिवारी झालेला हा रिमझिम पाऊस पिकांना तात्पुरता आधार देणारा ठरला असला, तरी विहिरींची पातळी वाढण्यासाठी आणि जमिनीतील ओलावा मुळांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठ्या पावसाची नितांत गरज आहे. सोयगाव परिसरामधील शेतांमध्ये साचले पाणी : सोयगाव परिसरात ३१ दिवसांच्या खंडानंतर शुक्रवारी सायंकाळपासून पावसाने पुनरागमन केले. सोयगाव व जरंडी मंडळात मध्यम, तर फर्दापूर व सावळदबारा मंडळात जोरदार पाऊस झाला. शनिवारी दिवसभर रिमझिम संततधार सुरू राहिल्याने शेतीची कामे ठप्प झाली होती. पावसामुळे खरिपाला दिलासा मिळाला असला तरी काही शेतांमध्ये पाणी साचल्याने नुकसानीची भीती आहे.

## धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी एल्गार

### मोर्चा शासनाच्या उरात धडकी भरवणारा ठरणार, दीपक बोऱ्हाडे

हिंगोली । प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सुरू असलेल्या लढ्याला अधिक तीव्र करण्यासाठी येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी परभणी येथे भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा शासनाच्या उरात धडकी भरविणारा ठरणार असल्याची दावा धनगर समाजाचे नेते तथा आंदोलक दीपक बोऱ्हाडे यांनी शनिवारी ता. १२ हिंगोलीत पत्रकारांशी बोलतांना केला आहे.

हिंगोली येथील शासकिय विश्रामगृहात धनगर समाजाच्या बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शशीकांत वडकुते यांच्यासह समाजातील नेते व नागरीक उपस्थि होते. यावेळी बोलताना दीपक बोऱ्हाडे म्हणाले की, धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची



अंमलबजावणी व्हावी यासाठी गेल्या कित्येक पिढ्यांपासून आणि दशकांपासून सातत्याने कायदेशीर लढाई व संघर्ष सुरू आहे. जालना येथे धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाचा मुक्ती संग्राम लढा सुरू होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. शासनाने निवडणुकीच्या काळात धनगर समाजाला दिलेल्या वचनांची व आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे. सरकारने वारंवार धनगर समाजाला आरक्षणाबाबत आश्वासने दिली, परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी फसवणूक केली. धनगर समाजाला आता सरकारच्या फसवणुकीचा राग आला असून, आपल्या लेकराबाळांच्या कल्याणासाठी समाज आता ताकदीने रस्त्यावर उतरला आहे. जोपर्यंत आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. परभणी येथील १७ सप्टेंबरच्या महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रमुख व महत्त्वाच्या बांधवांची बैठक पार पडली. हिंगोली जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील धनगर बांधवांनी या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. परभणी येथील हा महामोर्चा सरकाराच्या उरात धडकी भरवणारा ठरेल आणि या आंदोलनाची ज्वाला राज्यभर पेटेल, असा दावाही त्यांनी केला आहे.

## शाडू मातीच्या गणरायाला विद्यार्थ्यांच्या हातांनी आकार

### श्री.नाथ विद्या मंदिरात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

वसंतटेकडी येथील श्री. नाथ विद्या मंदिर, शनैश्वरनगर येथे दिव्य मराठीच्या आवाहनाला प्रतिसाद विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. शनिवारी सकाळी ११ वाजता आयोजित कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीचे महत्त्व, पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची गरज तसेच गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, निसर्गप्रेम आणि



सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच नागरिकांनीही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शाडू मातीच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यशाळेस मार्गदर्शक बालाजी वल्लाळ यांचे मार्गदर्शन लाभले. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून पर्यावरणसंरक्षणाचे कार्य करणारे ऋषिकेश लांडगे व गौतम गराडे उपस्थित होते. यन्नम मॅडम यांनी वल्लाळ यांचा परिचय करून दिला. यावेळी कडनोर मॅडम यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापिका साईगीता सब्बन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. सूत्रसंचालन व्ही. बी. कबाडी यांनी केले. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व उपस्थित मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.१४ सप्टेंबर २०२६ | ६

# अंबाजोगाईत सराईत दारूमाफियावर 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई; हर्सूल कारागृहात रवानगी

## आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा दणका

बीड / अंबाजोगाई । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बीड पोलीस दल आणि जिल्हा प्रशासनाने समाजकंटक व अवैध धंदेवाईकांविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत दारूमाफिया किशोर बाबुराव जाधव (वय ३९, रा. चनई, ता. अंबाजोगाई) याच्यावर 'एमपीडीए' कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली असून, त्याची छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

### अवैध धंदे करणाऱ्यांवर मोक्का, एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाईचा पोलीस अधीक्षकांचा इशारा





याबाबत अधिक माहिती अशी की, किशोर जाधव याच्याविरुद्ध हातभट्टीची अवैध दारू तयार करणे, जवळ बाळगणे, वाहतूक व बेकायदेशीर विक्री करणे यांसारखे महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियमांतर्गत तब्बल ६ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी १६ ऑगस्ट २०२५ रोजी त्याच्यावर दारूबंदी कायद्याच्या कलम ९३ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती; मात्र तरीही त्याच्या अवैध कारवाया सुरूच होत्या व तो पोलिसांच्या कारवाईला जुमानत नव्हता.

त्यामुळे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत किशोर जाधव याच्याविरुद्ध 'बूटलेगर' या सदराखाली स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ११ सप्टेंबर २०२६ रोजी मंजुरी दिली. त्यानंतर अंबाजोगाई शहर पोलिसांनी १२ सप्टेंबर रोजी त्यास ताब्यात घेऊन हर्सूल मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केले आहे.

### अवैध धंदे, गुंडगिरी खपवून घेणार नाही: पो.अ.नवनीत काँवत

भविष्यातही अवैध वाळू वाहतूक, गुटखा विक्री, धार्मिक व जातीय तेढ निर्माण करणारे समाजकंटक, खंडणीखोर, गुंड प्रवृत्तीचे लोक तसेच बेकायदेशीर जुगार, लॉटरी आणि हातभट्टी दारू चालवणाऱ्यांवर 'एमपीडीए' आणि 'मोक्का' अंतर्गत अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल.

– नवनीत काँवत (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, बीड

ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शहरचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, घुले, पोलीस अंमलदार श्रीकृष्ण वडकर, नागरगोजे, महिला पोलीस पाचपिंडे, चादर तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोउपनि अभिमन्यू औताडे, सचिन सानप, सचिन आंधळे, रामचंद्र केकाण, गोविंद भताने, बबन सलगर व बिभीषण चव्हाण यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



# बसस्थानकातुन मंगळसूत्र लांबवणारा चोरटा गजाआड; ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई बसस्थानकात प्रवाशांच्या गर्दीचा गैरफायदा घेऊन महिलांचे दागिने पळवणाऱ्या एका सराईत चोरट्याला गेवराई पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेले ४८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. वैजिनाथ नामदेव गुंजाळ (वय ५६, रा. माऊली नगर, पेठ बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, सिंदखेड (ता. गेवराई) येथील रहिवासी प्रयागाबाई सुभाष ठोसर (वय ६५) या २ सप्टेंबर रोजी दुपारी कामासाठी गेवराई येथे आल्या होत्या. काम आटोपून गावी जाण्यासाठी बसस्थानकावर गेवराई ते कोळगाव ◀◀ पान ३ वर

# सभापती शेख निजाम यांची बदनामी; सोशल मीडियावर विकृत छायाचित्र व्हायरल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर छायाचित्राचा गैरवापर करून एका लोकप्रतिनिधीची सार्वजनिक बदनामी केल्याचा प्रकार समोर आला आहे. बीड नगरपरिषदेचे प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक तथा स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम शेख जैनुद्दीन यांच्या प्रतिमेचा गैरवापर करून विटंबनात्मक छायाचित्र व्हायरल केल्याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



तक्रारीनुसार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास शेख निजाम हे नगरपरिषद कार्यालयात कामकाजासाठी उपस्थित असताना एका परिचिताने त्यांच्या मोबाईलवर एक छायाचित्र दाखवले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणादरम्यान शेख निजाम यांच्या मूळ छायाचित्राचा गैरवापर करून, त्यांना तृतीयपंथी व्यक्तींच्या वेशभूषेशी जोडणारे विकृत व विडंबनात्मक छायाचित्र तयार करण्यात आले होते. सदर छायाचित्र केवळ उपोषणस्थळीच नव्हे, तर 'भीमपुत्र प्रेम धर्मेंद्र कांबळे' नावाच्या फेसबुक अकाउंटवरून तसेच इतर सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या कृत्यामुळे शेख निजाम यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेला गंभीर धक्का पोहोचला असून, समाजात त्यांची जाणीवपूर्वक बदनामी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या तक्रारीवरून बीड शहर पोलिसांनी प्रेम धर्मेंद्र कांबळे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ३५६(२) (मानहानी) अंतर्गत अदखलपात्र गुन्हा (NCR No. 0215/2026) नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# नाळवंडीतील पिडित चिमुकलीला न्याय देऊ

## ना. पंकजाताई मुंडेंचे बीड एसपींना निर्देश ; आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रकरण जलदगती कोर्टात चालवा

बीड । प्रतिनिधी

नाळवंडी ता. पाटोदा येथील आठ वर्षाच्या चिमुकलीवर झालेली अत्याचाराची घटना अत्यंत घृणास्पद आणि संतापजनक असून यातील नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी हे प्रकरण जलदगती कोर्टात चालवावे असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.



या प्रकरणी आज ना. पंकजाताईंनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना फोन करून आरोपीवर कठोर कारवाई करण्यास सांगितले. नाळवंडी गावातील एका आठ वर्षाच्या चिमकुलीवर ६५ वर्षाच्या नराधमाने अत्याचार केला. या घटनेने पिडीत चिमुकलीचे कुटुंब भयभीत झाले आहे. घटनेतील आरोपीला पोलिसांनी अटक केली असली तरी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे आणि आरोपीवर कठोरात कठोर शासन करावे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

# आष्टी पोलीस ठाण्याचा स्वतंत्र प्रभार डीवायएसपी भारत पांढरे यांच्याकडे

बीड / आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमानुसार परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत प्रकाश पांढरे यांच्याकडे आष्टी पोलीस ठाण्याचा स्वतंत्र प्रभार सोपविण्यात आला आहे. मा. पोलीस अधीक्षक, बीड यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

### पो.नि. शरद भुतेकर तात्पुरते पोलीस नियंत्रण कक्षात नियुक्त

परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना ग्रामीण पोलीस ठाण्यातील प्रत्यक्ष कामकाज, कायदा व सुव्यवस्थेचे व्यवस्थापन, गुन्हे तपास तसेच ठाण्याच्या स्वतंत्र कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार, पांढरे हे दिनांक १४ सप्टेंबर २०२६ ते ०६ डिसेंबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून कामकाज सांभाळणार आहेत. दरम्यान, या तीन महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांची तात्पुरत्या स्वरूपात पोलीस नियंत्रण कक्ष, बीड येथे नेमणूक करण्यात आली आहे.

# मोंढा गणेश मंडळात गणेशोत्सवाची जय्यत तयारी; 'कालिया मर्दन'चा भव्य जिवंत देखावा आकर्षणाचे केंद्र

माजलगाव । प्रतिनिधी

शहराची शान आणि हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मोंढा गणेश मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त श्री गणरायाच्या आगमन सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. गणेशोत्सवाची उत्सुकता शिगेला पोहोचली असून मंडप उभारणी तसेच आकर्षक देखाव्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.




गणेश चतुर्थीच्या दिवशी ढोल-ताशांच्या गजरात आणि भव्य मिरवणुकीने श्री गणरायाची स्थापना करण्यात येणार आहे. यंदा भाविकांसाठी धार्मिक व सांस्कृतिक परंपरेची अनुभूती देणारा 'कालिया मर्दन' हा नयनरम्य देखावा साकारण्यात येत आहे. विशेष प्रकाशयोजना व ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून हा देखावा भाविकांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

मोंढा गणेश मंडळाच्या वतीने माजलगाव शहर व परिसरातील सर्व भाविकांना गणेशोत्सवातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. श्री गणरायाचे दर्शन, महाआरती व प्रसादाचा लाभ घेऊन उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष प्रताप ललवाणी व उपाध्यक्ष कृष्णा चांडक व मंडळाच्या सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.


# गंभीर दखल व कठोर भूमिका: परळीत टाकी बराच वेळ ओव्हरफ्लो होऊन पाण्याची नासाडी; संबंधित कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई!

### मोंढा मार्केटमधील पाण्याच्या टाकीवर हजारो लिटर पाणी वाया गेल्याचा ठपका ठेवत काढला निलंबन आदेश

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्याने पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेता नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व न. प. पदाधिकारी पाणीपुरवठ्याच्या बाबतीत अतिशय गंभीर असल्याचे बघायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच वान प्रकल्पातील अवैध पाणी उपशाच्यामुद्द्यावरून नगराध्यक्षांचे आक्रमक रूपही बघायला मिळाले होते.अशा परिस्थितीत पाण्याची बचत आणि काटेकोर नियोजन करण्याची गरज असताना मोंढा मार्केट येथील पाण्याच्या टाकीवरून हजारो लिटर पाणी वाया गेल्याचा प्रकार समोर आला. अनेक नागरिकांनी याबाबत नगराध्यक्षा, पाणीपुरवठा सभापती व नगरसेवकांकडे तक्रारी केल्या होत्या.याची गंभीर दखल घेत याप्रकरणी कठोर भूमिका घेण्यात आली असून संबंधित एका कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

मोंढा मार्केट येथील पाण्याच्या टाकीवर नियुक्त असताना संबंधित कर्मचाऱ्यांकडून ही टाकी निर्धारित वेळेपेक्षा अधिक काळ ओव्हरफ्लो होऊन त्यातील हजारो लिटर पाणी वाया गेल्याचे निदर्शनास आले. याबाबत मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास बाब आणून देण्यात ◀◀ पान ३ वर



# गणपती व महालक्ष्मी सणामुळे युसूफवडगावचा आठवडी बाजार फुलला

युसूफवडगांव । प्रतिनिधी

गणपती व महालक्ष्मी सणाच्या पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील आठवडी बाजारात चांगलीच लगबग पाहायला मिळाली. उद्या गणरायाचे आगमन, तर त्यानंतर दोन दिवसांनी महालक्ष्मीचे आगमन होणार असल्याने बाजारपेठेत सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. गणपतीच्या लहान-मोठ्या आकर्षक मूर्ती, महालक्ष्मीचे विविध प्रकारचे मुखवटे तसेच सजावटीचे साहित्य विक्रीसाठी दाखल झाले असून, खरेदीसाठी विशेषतः महिलांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले.



मूर्ती, मुखवटे व सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी महिलांची गर्दी; महागाई आणि दुष्काळाचे सावट कायम

गणपती व महालक्ष्मीची स्थापना करण्यासाठी लागणारे सजावटीचे विविध साहित्य, फुलांच्या माळा, तोरणे, आकर्षक मखर, पूजेचे साहित्य यासह विविध वस्तूंनी आठवडी बाजार सजला आहे. आपल्या घरातील सण पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यासाठी नागरिकांकडून आवडीने खरेदी केली जात आहे.

महागाई अन् दुष्काळाचे सावट, ◀◀ पान ३ वर

# नवगण राजुरीत अखंड हरिनाम सप्ताह सुरू

नवगण राजुरी । प्रतिनिधी

मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी गणेश जन्म महोत्सवा निमित्त दि. १२ ते १९ सप्टेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्याच्या माजी खासदार स्व.केशरकाकू क्षीरसागर आणि सोनाजीराव क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून आरंभ झालेल्या आणि आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ५ काकडा आरती, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी ३ ते ५ गणेशपुराण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन त्यानंतर भजन, भारुड होणार असून यात ह.भ.प. जनार्दन महाराज शिंदे मत्सेंद्रगड, सुधाकर महाराज वाघ पैठण, रामकृष्ण महाराज रंधवे पाटोदा, दीपक महाराज बादाडे काडीवडगाव, पुष्कर महाराज गोसावी, राधाताई महाराज सानप महासांगवी, भरत महाराज जोगी परळी यांचे हरिकीर्तन होणार असून सोमवार दि. १४ रोजी श्री गणेशास गंगेच्या कावडीने जलाभिषेक घालण्यात येईल. रात्री ११ ते १२ या वेळेत आरती, उपासना व गणेश जन्माचे भजन होईल. शुक्रवार दि. १८ रोजी महाद्वारचा अनादिकाला होईल व नंतर श्रींच्या पालखीची गावातून भव्य मिरवणूक निघेल. या सप्ताहाची सांगता शनिवार दि. १९ रोजी ह.भ.प. प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज श्रीक्षेत्र संस्थान नारायण गड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसाद होईल तरी भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

# डॉक्टर जीवनदान देतात, तर फिजिओथेरपिस्ट आनंदाने जगण्याची ताकद : डॉ. आदिती सारडा

## आदित्य फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून मांडले हृदयविकार अन् पक्षाघातातील फिजिओथेरपीचे महत्त्व

बीड । प्रतिनिधी

धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आज लहान वयातच गंभीर आजार वाढले आहेत. अशा वेळी औषध अथवा शस्त्रक्रियेविना रुग्णाला पुन्हा स्वावलंबी बनवण्याचे महान कार्य फिजिओथेरपी करते. डॉक्टर रुग्णाला जीवनदान देतात, पण फिजिओथेरपिस्ट त्यांना ते जीवन पुन्हा आनंदाने आणि हालचालींसह जगण्याची ताकद देतात,असे प्रतिपादन आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.



वर्ल्ड फिजिओथेरपी या जागतिक संघटनेच्या ८ सप्टेंबर १९५१ रोजी झालेल्या स्थापनेचे औचित्य साधून आदित्य एज्युकेशन ग्रुप कॅम्पसमध्ये जागतिक फिजिओथेरपी दिन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित या कार्यक्रमात आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार तसेच पक्षाघात यांसारख्या गंभीर आजारांवर प्रतिबंध, व्यवस्थापन आणि पुनर्वसनात फिजिओथेरपीचे महत्त्व विशद करणारे प्रभावी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते पार पडले. व्यासपीठावर आदित्य कृषीचे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26